दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -३४८ | बुधवार दि.२६ ऑगस्ट २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-348 Wednesday, Dt.26 August 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# बीड नगरपालिकेत 'आपसातच' सत्ता संघर्षाचा भडका.!
# नगराध्यक्ष-उपनगराध्यक्ष आमनेसामने, विरोधक मात्र शांत

## सत्ताधाऱ्यांमध्येच कलगीतुरा, पालकमंत्री सुनेत्रा पवार आता निर्णायक हस्तक्षेप करणार का ?

बीड । वैभव स्वामी

बीड नगरपालिकेवर अजित दादा पवार राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच सत्ताधारी गटातील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते व काही नगरसेवकांमध्ये विविध प्रशासकीय व विकासकामांच्या मुद्द्यांवरून मतभेद वारंवार उफाळून येत असल्याचे अलीकडील घटनाक्रमातून समोर आले आहे. विशेष म्हणजे विरोधकांपेक्षा सत्ताधारीच एकमेकांविरोधात उभे ठाकल्याने बीडच्या राजकारणात नवा प्रश्न निर्माण झाला आहे.

**वाद नेमका कशावरून..?**

नगरपालिकेतील संघर्षाला केवळ व्यक्तीगत मतभेदांचे स्वरूप नसून विकासकामे मंजूर करण्याची पद्धत, कामांचे विभाजन, प्रशासनाशी पत्रव्यवहार आणि निर्णयप्रक्रियेतील अधिकार हेही प्रमुख मुद्दे बनले आहेत. काही नगरसेवकांनी स्वतंत्र भूमिका घेतल्याने सत्ताधारी गटातील मतभेद अधिक तीव्र झाले आहेत.

अलीकडील सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांच्यात झालेल्या शाब्दिक संघर्षामुळे हा अंतर्गत वाद आणखी उघड झाला. त्यानंतर उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांच्या बॅनरवर राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेतृत्वातील काही प्रमुख नेत्यांचे फोटो नसल्याची बाबही चर्चेत आली आहे. मात्र, या कृतीमागील नेमका राजकीय हेतू संबंधितांनी अधिकृतपणे स्पष्ट केलेला नाही मात्र तो लपूनही राहिलेला नाही.

**पालकमंत्री सुनेत्रा पवारांचा हस्तक्षेपही अपुरा.?**

उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षांतर्गत तणाव आणि नगरपालिकेतील गटबाजीवर लक्ष देण्याचा प्रयत्न केल्याचे वृत्त यापूर्वी प्रसिद्ध झाले होते. त्यांच्या दौऱ्यानंतरही नगरपालिकेतील गटबाजी कायम राहिली आहे हे विशेष.

त्यामुळे आता बीड नगरपालिकेतील सत्ताधारी पक्षांतर्गत संघर्षावर पालकमंत्री म्हणून त्या निर्णायक हस्तक्षेप करून दोन्ही गटांना एका टेबलावर आणणार का ? आपसातील वाद मिटवणार का हा प्रश्न बीडकरांना पडला आहे.

**विजयसिंह पंडितांची 'नेतृत्वाची कसोटी'**

बीड नगरपालिकेतील सत्ता राष्ट्रवादी काँग्रेसकडे आणण्यात गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांची महत्त्वाची भूमिका आहे. मात्र, आता त्याच सत्ताधारी गटात दोन प्रवाह निर्माण झाल्याने पंडित हे अंतर्गत संघर्षावर तोडगा काढण्यात यशस्वी ठरले आहेत का ? नगर पालिकेतील गटबाजीवर या नेतृत्वाचा प्रभाव कमी पडत आहे का ?




### 'लोण्याचा गोळा' कुणासाठी ?

नगरपालिकेची सत्ता ही शहरातील पाणी, कचरा, रस्ते, आरोग्य, स्वच्छता आणि मूलभूत नागरी सुविधांसाठी असते. मात्र, सत्ताधारी पक्षातीलच लोकप्रतिनिधी परस्परांशी संघर्ष करण्यात गुंतले असतील तर त्याचा थेट परिणाम शहराच्या विकासावर होण्याची भीती आहे.सत्तेच्या माध्यमातून 'कामे आणि अधिकार कुणाच्या हातात ?' यावरून राजकीय रस्सीखेच सुरू आहे, का सत्ताधारी नगरसेवकांचा हा संघर्ष आर्थिक फायद्यासाठीच होत आहे अशी चर्चा रंगली आहे.

### अहो अजब आश्चर्य विरोधक शांत, सत्ताधारीच भिडले.!

विशेष म्हणजे बीडच्या राजकारणात सत्ताधारी राष्ट्रवादीचे कट्टर विरोधक मानले जाणारे भाजपचे नगरसेवक आणि शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित गट यांच्यापेक्षा सत्ताधारी गटातील अंतर्गत संघर्षच अधिक चर्चेत आला आहे. त्यामुळे नागरिकांचा साधा प्रश्न आहे,सत्ता मिळवली ती शहराच्या विकासासाठी की सत्तेतील कुरघोड्यांसाठी ?

शहरातील मूलभूत प्रश्न कायम असताना सत्ताधारी गटातील हा संघर्ष किती दिवस चालणार ? पालकमंत्री सुनेत्रा पवार या वादाला पूर्णविराम देणार का ? आमदार विजयसिंह पंडित पुन्हा एकदा दोन्ही गटांना एकत्र आणणार का ? की बीड नगरपालिकेतील 'घरातील भांडण' आगामी काळात आणखी विकोपाला जाणार ? याकडे बीडकरांचे लक्ष लागले आहे.







दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
७ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२६

प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती ____

स.न.वि.वि.

मागील ६ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ७ वा वर्धापन दिन शनिवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठबळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२६' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

**वर्धापन दिन जाहिरात दरपत्रक**

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

**दिनदर्शिका-२०२७ जाहिरात दरपत्रक**

| क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १२ पेज | पूर्ण पट्टी | ३०,०००/- |
| २. | ६ पेज | पुर्ण पट्टी | २०,०००/- |
| ३. | १२ पेज | उभी पट्टी | ३०,०००/- |
| ४. | शुभेच्छा | पॅनल | २,०००/- |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.

प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड

महोदय,

वर्धापन दिन विशेषांक २०२६ किंवा दिनदर्शिका २०२७ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................/- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी ॲडव्हान्स रु............/- रोख/चेक/डी.डी./ ऑनलाईन जमा करत आहे.

जाहिरातदाराचे नाव : ____
गाव : ____ तालुका : ____ जिल्हा : ____
मो.नं. : ____

₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!

जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :-
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : vaibhav11swami@gmail.com

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर
9822628521
बँक खाते :
दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

७ व्या वर्धापन दिनानिमित्त

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती

## आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६

गौरव समर्पणाचा ! सन्मान ज्ञानदानाचा !!

**सहभागाकरीता नम्र आवाहन**

प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख
गुरुवार, २० ऑगस्ट २०२६

शिक्षण क्षेत्रातील समर्पण, अमूल्य योगदान आणि विशेष शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी 'दैनिक समर्थ राजयोग' च्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातील गुणवंत व उपक्रमशील शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.यावर्षी विशेष प्राधान्याने दिव्यांग शाळांमधील शिक्षक/कर्मचारी व दिव्यांग संस्थाचालक यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतली जाणार आहे. तसेच जिल्हा परिषद, नगरपरिषद व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील आपल्या विशेष कर्तृत्वाने आदर्शाचा वस्तुपाठ घालणाऱ्या शिक्षकांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. तरी आपण आपल्या विशेष व कौतुकास्पद कामाचा संक्षिप्त अहवाल (पुराव्यांसह/छायाचित्रांसह) पाठवावा ही विनंती.

वैभव जगदेवी विवेक स्वामी
- संपादक




**पुरस्कारासाठी पात्र निकष व वर्गवारी**

**1. दिव्यांग शाळा व संस्था :**
दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.
दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्य करणारे संस्थाचालक.
**निकष:**
दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी, शिक्षणासाठी व आत्मविश्वासासाठी केलेले विशेष व कौतुकास्पद कार्य.

**2. सामान्य शाळा वर्गवारी:**
जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळांमधील शिक्षक.
**निकष:**
गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक उपक्रमशीलता, सामाजिक सहभाग आणि उत्कृष्ट कार्यकाळ.

**प्रस्तावासोबत जोडायची माहिती:**
पूर्ण नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक, सध्या कार्यरत असलेली संस्था/शाळा व पद, शैक्षणिक कार्यकाळात केलेले कार्य.

आपले प्रस्ताव पाठवण्यासाठी: ईमेल: vaibhav11swami@gmail.com व्हॉट्सॲप / संपर्क: 9822628521
कार्यालयाचा पत्ता: दैनिक समर्थ राजयोग कार्यालय, सम्राट चौक, शाहुनगर कॉर्नर, बीड - ४३११२२

संपादकीय....

## दिमागी नक्षलींचे कुळ आणि मूळ

राज्याचे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील म्हणाले होते, की जंगलात दडून बसलेल्या नक्षलवाद्यांचे खरे सूत्रधार शहरातच आहेत. नक्षलवाद्यांना लागणारी सर्व रसद, पैसा आणि शस्त्रे शहरांमधूनच पुरवली जातात. नक्षलवाद्यांच्या सूत्रधारांना पकडण्यासाठी कायदे कमी पडतात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्ताने लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात देशातील काही व्यक्ती, शक्ती नक्षली बुद्धीच्या आहेत (दिमागी नक्षली) असा उल्लेख केला. त्यामुळे अनेकांच्या अंगाचा तीळपापड होऊ लागला आहे. अरविंद केजरीवाल, पी. चिदंबरम यासारख्या नेत्यांनी आम्ही नक्षली आहोत आणि आम्हाला त्याचा अभिमान आहे, अशा अर्थाचा उल्लेख असणाऱ्या पोस्ट समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होत आहेत. याचाच अर्थ पंतप्रधानांनी केलेला उल्लेख या मंडळींना चांगलाच खुपला आहे.

भारतात नक्षलवाद्यांचा उदय कसा झाला आणि त्यांनी केलेल्या हिंसाचारात हजारो निरपराध व्यक्तींचे बळी कसे गेले याची माहिती नव्या पिढीला नाही. म्हणनूच नक्षलवादामुळे देशाला किती मोठे नुकसान सहन करावे लागले आहे, याची माहिती सध्याच्या 'जेन झी'ला देणे आवश्यक आहे. सध्याच्या 'जेन झी'ला पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी देशात २००४ ते २०१४ कसा धुमाकूळ घातला होता याचीही कल्पना नाही. अत्यंत सुरक्षित वातावरणात, प्रगत तंत्रज्ञानाच्या काळात सध्याची 'जेन झी' वाढली आहे. आपण कळते होण्याच्या अगोदर सोनिया आणि राहुल गांधींच्या राज्यात, देशात नक्षलवांद्याचे आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांचे राज्य होते, याची माहिती नसलेल्या 'जेन झी'ला नक्षलवादाचा थोडक्यात इतिहास कळलाच पाहिजे. नक्षलवादाचा उदय सरकारी यंत्रणेच्या अत्याचाराविरोधात आणि जमीनदार, सावकार यांच्या दडपशाहीविरोधात झाला होता. नक्षलवाद्यांनी सरकारी यंत्रणा आणि प्रस्थापितांविरोधात सशस्त्र उठाव करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे पश्चिम बंगाल, ओदिशा, झारखंड, तेलंगणा, छत्तीसगड, महाराष्ट्र अशा अनेक राज्यांत सशस्त्र नक्षलवाद्यांनी निरपराध सामान्यांचे आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे बळी घेतले. पोलीस, सरकारी कर्मचारी, जमीनदार अत्याचार करीत असतील तर त्याविरोधात दाद मागण्याचा कायदेशीर मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाने उपलब्ध करून दिला आहे. मात्र त्यावर नक्षलवाद्यांचा विश्वास नाही. २००४ ते २०१४ या काळात नक्षलवाद आणि दहशतवाद उच्चांकी स्तरावर पोहचला होता. मनमोहन सिंग सरकार असताना नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात हजारो जण ठार झाले. छत्तीसगढमध्ये २५ मे २०१३ रोजी माओवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात आणि गोळीबारात ज्येष्ठ काँग्रेस नेते विद्याचरण शुक्ल यांच्यासह २७ जण ठार झाले. त्याआधी २०१० मध्ये छत्तीसगढमध्येच नक्षलवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात केंद्रीय सुरक्षा दलाचे ७६ जवान ठार झाले होते. अशा अनेक घटना त्या काळात घडल्या. मात्र त्यावेळच्या मनमोहन सिंग सरकारने नक्षलवाद्यांच्या विरोधात कडक कारवाई केली नाही. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर नक्षलवाद्यांविरोधात कडक कारवाई सुरू झाली. त्यामुळे नक्षलवादी शक्तींनी जंगलातून पळ काढत शहरांना आपले लक्ष्य केले. विविध जाती-जमातींत अफवा गैरसमज पसरवून दंगे घडविणे हे शहरी भागातील नक्षलवाद्यांचे उद्दिष्ट होते. २०१८ मध्ये भीमा-कोरेगाव येथे झालेला हिंसाचार आणि नवी मुंबईत पोलिसांवर झालेली दगडफेक, जाळपोळ ही शहरी नक्षलवाद्यांच्या कारवायांची मोठी उदाहरणे आहेत. नवी दिल्लीत शाहिनबाग आंदोलनावेळी अनेक दिवस रस्ते अडविण्यात आले. त्यानंतर दिल्लीत दंगल झाली, यात प्रमुख आरोपी होता आम आदमी पक्षाचा नगरसेवक ताहीर हुसेन. विद्यार्थी आंदोलनात पोलिसांनी संसदेवर मोर्चा काढण्यास परवानगी दिली नसताना मोर्चा काढला गेला, अनेक पोलिसांना मारहाण केली गेली,

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार मुख्य आरोपीला १० वर्षे सक्तमजुरी

### मदत करणाऱ्या दोघांना सहा महिन्यांचा कारावास २० हजारांचा दंड पीडितेला देण्याचे न्यायालयाचे आदेश

भोकरदन इसरारखान पठाण :- अल्पवयीन १६ वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिला गर्भवती केल्याप्रकरणी मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय-४ जालना यांनी मुख्य आरोपीला १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. तसेच आरोपीला मदत करणाऱ्या दोघांना प्रत्येकी सहा महिन्यांची सक्तमजुरी व दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. रुपेश मोरे यांनी मंगळवारी दि. २५ हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.या प्रकरणातील मुख्य आरोपी नितीन दत्तू पोटदुखे वय १९ यास भादंवि कलम ३७६ (२) (एन) तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४ व ८ अन्वये दोषी ठरवून १० वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. दंड न भरल्यास त्यास आणखी सहा महिन्यांचा सक्त कारावास भोगावा लागणार आहे.तर आरोपीला मदत केल्याप्रकरणी शिवाजी वीरवनाथ काळबिले वय २९ आणि बाली ऊर्फ किरण शिवाजी काळबिले दोघेही रा. धारणी ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांना भादंवि कलम ३६३ सह ३४ अन्वये प्रत्येकी सहा महिने सक्तमजुरी आणि पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली.दंड न भरल्यास प्रत्येकी एक महिन्याचा सक्त कारावास भोगावा लागणार आहे. न्यायालयाने आरोपींकडून वसूल होणारी



एकूण २० हजार रुपयांची दंडाची रक्कम पीडितेला देण्याचे आदेशही दिले आहेत.वाहनातून कामावर जाताना वाढली ओळख या प्रकरणातील पीडित मुलगी १६ वर्षांची होती.आरोपी व पीडितेची गावे जवळ असल्याने त्यांची ओळख होती.आरोपीकडे छोटा हत्ती वाहन असल्याने पीडिता इतर मजुरांसह त्याच्या वाहनातून परिसरातील गावांमध्ये कामासाठी जात होती.याच काळात आरोपीने तिच्याशी जवळीक वाढविली. फिर्यादीपूर्वी सुमारे सात ते आठ महिन्यांपासून आरोपीने पीडितेसोबत शारीरिक संबंध ठेवल्याने ती गर्भवती राहिली असे तपासात निष्पन्न झाले.

त्यानंतर पीडिता आईसोबत नातेवाईकांकडे राहण्यासाठी गेली असताना आरोपीने आपल्या बहिणी व मेव्हण्याच्या मदतीने तिला रिक्षातून मित्राच्या खोलीवर नेले. तेथे तिला आठ ते दहा दिवस ठेवण्यात आले. आरोपी शिवाजी व बाली यांनी आरोपी व पीडितेला जेवण आणून देण्यासह इतर मदत केल्याचे तपासात समोर आले. तसेच लग्नाचे आमिष दाखवून आरोपीने पीडितेसोबत संबंध प्रस्थापित केल्याचे अभियोजन पक्षाने न्यायालयासमोर मांडले.

हरवल्याची तक्रार अखेर समोर आली घटना

पीडितेच्या आईने १२ जुलै २०१९ रोजी जवाहरनगर पोलीस ठाण्यात मुलगी हरवल्याची तक्रार दाखल केली होती.पोलिसांनी पीडितेला महिला सुधारगृहात पाठविले होते.मात्र तिने आईकडे जाण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर तिला सोडण्यात आले. आई-वडिलांनी विचारपूस केल्यानंतर पीडितेने घडलेली संपूर्ण हकीकत सांगितली.

यानंतर २७ सप्टेंबर २०१९ रोजी महिला दक्षता समितीच्या सदस्यांसमोर पीडितेने फिर्याद दिली. त्यावरून पारध पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३५/२०१९ अन्वये भादंवि कलम ३६३, ३७६,५०६ सह ३४ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ३, ४, ७ व ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

डीएनए अहवाल ठरला महत्त्वाचा पुरावा

या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस आयुक्त रविंद्र साळोखे उस्मानपुरा विभाग औरंगाबाद शहर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील जायभाये, भोकरदन यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

सरकार पक्षातर्फे एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये पीडित मुलगी तिचे वडील घटनास्थळ पंच किशोर सोळंके पीडितेची जन्मतारीख सिद्ध करणारे शाळेचे मुख्याध्यापक अलीबाबा रशिद तडवी पोलीस साक्षीदार संदीप तागड,श्रद्धा वायदंडे तसेच तपासी अंमलदार यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या.पीडितेचे वय सिद्ध करण्यासाठी शाळेने दिलेला निर्गम उतारा हा महत्त्वाचा पुरावा ठरला. यासोबतच वैद्यकीय अहवाल आणि पीडितेला झालेल्या बाळाचा डीएनए अहवालही अभियोजन पक्षाच्या बाजूने महत्त्वाचा ठरला.पुरावे व दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने मुख्य आरोपीसह मदत करणाऱ्या दोघांना दोषी ठरवत शिक्षा सुनावली.

### सरकारी अभियोक्त्यांचा प्रभावी युक्तिवाद

सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता ड. वर्षा लक्ष्मीकांत मुकीम यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांच्या युक्तिवादासह सादर करण्यात आलेले साक्षी-पुरावे आणि दस्तऐवजी पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने हा निकाल दिला.या प्रकरणाच्या तपास व न्यायालयीन पैरवीसाठी मा. पोलीस अधीक्षक जालना अपर पोलीस अधीक्षक जालना तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन यांच्या मार्गदर्शनाखाली पारध पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि माने आणि सेशन कोर्ट पैरवी पोलीस अंमलदार तसेच जिल्हा सरकारी वकील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली.

## भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे भविष्य उज्ज्वल : डॉ. योगेश रसाळ

बीड प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्थेच्या सौ. के.एस.के. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग, संशोधन व विकास कक्ष व विज्ञान मंडळाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त दि. २३ ऑगस्ट रोजी ऑनलाइन अतिथी व्याख्यान झाले.

यावेळी श्रीमती एस.के. गांधी महाविद्यालय, कडा येथील प्रो. डॉ. योगेश रसाळ यांनी 'भारतातील अंतराळ तंत्रज्ञान' विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी भारताचा अंतराळ संशोधन प्रवास, चंद्रयान मोहिमा, ब्लॅक होल, उपग्रह तंत्रज्ञान तसेच अंतराळ तंत्रज्ञानाचा शेती, हवामान, दळणवळण, शिक्षण व आपत्ती व्यवस्थापनातील उपयोग स्पष्ट केला. चंद्रयान-३च्या यशामुळे भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशात यशस्वी सॉफ्ट लँडिंग करणारा पहिला देश म्हणून इतिहास घडविल्याचे त्यांनी नमूद केले. भारताचा अंतराळ कार्यक्रम वैज्ञानिक प्रगतीला नवी दिशा देणारा असून त्याचे भविष्य उज्ज्वल असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य तथा भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिवानंद क्षीरसागर होते. उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्या



डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ. शंकर राऊत, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगन, पर्यवेक्षक प्रा. आसाराम खुटाळे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

आयोजनासाठी डॉ. सुधाकर गुट्टे व डॉ. विश्वंभर देशमाने यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. अशोक डोंगरे, तर आभार प्रा. रुपेश कोकाटे यांनी मानले. डॉ. पूनम दुबे व श्री. धनंजय बुरांडे यांनी सहकार्य केले. व्याख्यानास विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## शाळांची दुरुस्ती, मूलभूत सुविधांच्या कामांसाठी कालबद्ध कार्यक्रम राबवा -पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

लातूर प्रतिनिधी

जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका शाळांमधील मुला-मुलींची स्वच्छतागृहे, प्रयोगशाळा, वर्गखोल्या दुरुस्ती, सुरक्षा भिंत आणि वीज पुरवठा या मूलभूत सुविधांच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देऊन युद्धपातळीवर नियोजन व लवकरात लवकर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः वैयक्तिक लक्ष देवून आढावा घेत असून त्यांच्या सूचनेनुसार ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे शाळानिहाय कामांचा आराखडा तयार करून कालबद्ध कार्यक्रम राबवावा, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या.

पालकमंत्री श्री. भोसले यांच्या




अध्यक्षतेखाली शाळा दुरुस्ती, देखभाल व मूलभूत सुविधांबाबत आढावा बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह शिक्षण विभागाचे जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १,२६८ शाळांमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या वर्गखोल्या, स्वच्छता गृहे, विद्युत जोडणी, सुरक्षा भिंत व इतर सुविधा याबाबतची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी यावेळी मांडली. लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी लातूर शहरातील शाळांबाबत माहिती दिली.

# जालना ६ किलो २८५ ग्रॅम गांजासह अंबडचा तरुण जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ३ लाख ८ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त

जालना शेख फारुक :- अवैध गांजा विक्रीविरोधात जालना स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करीत अंबड येथील एका तरुणाला गांजासह ताब्यात घेतले.सुरज सदाशिव हादगुळे वय २४ रा.महेबुबनगर अंबड ता.अंबड जि.जालना असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.त्याच्याकडून ६ किलो २८५ ग्रॅम गांजा असा एकूण ३ लाख ८ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.जिल्ह्यात अवैध गांजा विक्री व वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला कारवाईच्या सूचना दिल्या होत्या.त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गांजा विक्री करणार्यांची माहिती घेण्यास सुरुवात केली.दरम्यान २५ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला सुरज हादगुळे हा गांजा बाळगून असल्याची माहिती मिळाली.या माहितीच्या आधारे पोलिसांनी नुरशाहवली दर्गा रोड बसस्थानक परिसर जालना येथे कारवाई करून त्याला ताब्यात घेतले.त्याच्याकडील झडतीमध्ये ६ किलो २८५ ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजा जप्त केला.

या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाणे जालना येथे एनडीपीएस कायदा १९८५ मधील कलम ८(क),२०(ब) ळळ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांच्या सरकारतर्फे फिर्यादीवरून पुढील कारवाई करण्यात आली.अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू,अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, विजय डिक्कर, फुलचंद गव्हाणे, इरशाद पटेल, सतीश श्रीवास, रमेश काळे, योगेश सहाने, प्रदीप करतारे, गणपत पवार व सुनील पवार यांच्या पथकाने केली.

## तथागत भगवान बुद्धांचा धम्मच जगाच्या कल्याणाचा मार्ग : व्ही.एन. निसर्गन

बीड /प्रतिनिधी

अंथरवण पिंप्री ता. जि. बीड येथे भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना भारतीय बौद्ध महासभेचे माजी राष्ट्रीय संघटक व्ही.एन. निसर्गन गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी बुद्ध धम्म हा जगाच्या कल्याणाचा मार्ग असून, तरुणांनी धम्माचा अभ्यास करून सामाजिक परिवर्तनासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष सरपंच जालींदर शिंदे व आयोजक गौतम कांबळे यांनी सपत्नीक भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन केले. व्ही.एन. निसर्गन गुरुजी यांनी त्रिशरण, पंचशील व प्रतिष्ठापना गाथा घेत बुद्ध व डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण केले.

प्रास्ताविकात माजी सरपंच बबनराव वाघमारे यांनी गावात बुद्धांची सात घरे असून, माजी सरपंच भाऊराव प्रभाळे यांनी विहार बांधून विद्यार्थ्यांसाठी २०० पुस्तकांची व्यवस्था केल्याचे सांगितले. प्रभाळे यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी दिपेश कांबळे, गौतम कांबळे, सुनील कांबळे, सरपंच जालींदर शिंदे, उपसरपंच अशोक शिंदे, माजी सरपंच भाऊराव प्रभाळे आदी उपस्थित होते. स्वीटी कांबळे हिने वडील गौतम कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त शायरी सादर केली. गौतम कांबळे यांचा ३६ वा वाढदिवसही साजरा करण्यात आला.

दरम्यान, रविंद्र राजाभाऊ प्रभाळे यांची आयडीबीआय बँकेत व्यवस्थापकपदी निवड




झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. दिवाळीच्या सुट्टीत नागसेन बुद्ध विहार, पालवण चौक येथे १० दिवसीय श्रामणेर शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती देत तरुणांनी सहभागी होण्याचे आवाहन निसर्गन गुरुजी यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक संतराम शिंदे, वसंत प्रभू शिंदे, सुनीता सुनील कांडेकर, माया गौतम कांबळे, मीरा दिपेश कांबळे, उषा रवी कांबळे, सुनील अर्जुन कांडेकर, दिपेश कांबळे, गौतम कांबळे, सुनील कांबळे यांनी परिश्रम घेतले. आभार बबनराव वाघमारे यांनी मानले. प्रणामाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६१२/२०२६**
**पार्वती भ्र. गंगाधर सावळे व इतर वि. निरंक**
**मार्फत - ॲड एस. के. निकम, गेवराई**

अर्जदार
१. पार्वती भ्र. गंगाधर सावळे
वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा. राम मंदीर गल्ली गेवराई, ता. गेवराई जि. बीड
२. संतोष पि. गंगाधर सावळे
वय ३८ वर्षे, धंदा - मजुरी
रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड
३. अमोल पि. गंगाधर सावळे
वय ३६ वर्षे, धंदा - व्यापार
रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड
४. आकाश पि. गंगाधर सावळे
वय ३४ वर्षे, धंदा - व्यापार
रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड
५. ज्योती भ्र. अनिल सुदुसे
वय ४१ वर्षे, धंदा घरकाम रा. औंढा नागनाथ ता. औंढा जि. हिंगोली
६. मिना भ्र. तान्हाजी नेमाडे
वय ३९ वर्षे, धंदा - घरकाम रा. भोईपुरा, सदर बाजार हिंगोली ता. जि. हिंगोली

ज्याअर्थी मयत गंगाधर तुळशीराम सावळे हे/हया अनुक्रमे दिनांक १७/०४/२०२१ रोजी मौजे गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत गंगाधर तुळशीराम सावळे रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः- २३/०९/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**मूळ धनादेश व याचाच रिटर्न मेमो हरवल्या बाबत**

मी शिवाजी विश्वनाथ जाधव रा. विश्व नगर सूर्या लॉन्स कॅनॉल रोड बीड माझ्याकडील Kotak Mahindra Bank चा Cheque No. 10, Account No. 5545926716, दिनांक १७/१२/२०२३, रक्कम २,१५,०००/- असलेला मूळ धनादेश व याचाच रिटर्न मेमो अनवधानाने हरवला आहे. सदर धनादेश व मेमो कोणास मिळाल्यास खालील पत्त्यावर किंवा मोबाईल नंबर वर संपर्क करावा!

**शिवाजी विश्वनाथ जाधव**
रा. विश्व नगर सूर्या लॉन्स कॅनॉल रोड बीड . ता. जि. बीड
मो. न. +९१ ९४२२२ ४३६४८

# 'जाणीव प्रतिष्ठान'च्या नावाने वर्गणी उकळणाऱ्यांपासून सावधान!

## मोफत अन्नवाटपाच्या सेवाभावी उपक्रमाचा गैरफायदा घेणाऱ्यांना प्रतिष्ठानचा इशारा, 'एक रुपयाचीही देणगी देऊ नका'-संस्थापक ड. विवेकानंद सानप

बीड । प्रतिनिधी

सिव्हिल हॉस्पिटल परिसरात गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी गेल्या १० ते १५ वर्षांपासून सुरू असलेल्या 'जाणीव प्रतिष्ठान'च्या निःशुल्क अन्नवाटप सेवाकार्याच्या नावाचा गैरवापर करून काही व्यक्ती नागरिकांकडून वर्गणी व देणगी उकळत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकारापासून नागरिकांनी सावध राहावे आणि संबंधित व्यक्तींना कोणत्याही स्वरूपाची देणगी देऊ नये, असे आवाहन प्रतिष्ठानचे संस्थापक ड. विवेकानंद सानप यांनी केले आहे.

सिव्हिल हॉस्पिटल परिसरात दररोज सायंकाळी ५ ते ६ वाजेच्या दरम्यान गरजू रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी पुलाव राईस, खिचडी आदी खाद्यपदार्थांचे मोफत वाटप केले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून कोणतीही वर्गणी न घेता हा सेवाभावी उपक्रम सातत्याने सुरू असल्याचे प्रतिष्ठानकडून सांगण्यात आले.

मात्र, 'जाणीव प्रतिष्ठानच्या माध्यमातून मोफत पुलाव, राईस किंवा खिचडी वाटप करतो,' असे सांगून काही व्यक्ती नागरिक, डॉक्टर तसेच इतरांकडे पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. या व्यक्तींचा प्रतिष्ठानच्या अन्नवाटप उपक्रमाशी कोणताही संबंध नसल्याचे ड. सानप यांनी स्पष्ट केले आहे.सेवेच्या नावाखाली पैशांची मागणी, प्रतिष्ठानचा थेट इशारा!

जाणीव प्रतिष्ठानच्या नावाने कोणी वर्गणी, देणगी अथवा आर्थिक मदत मागत असल्यास नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये. 'सेवाकार्याच्या नावाखाली पैसे उकळणाऱ्यांना एक रुपयाचीही देणगी देऊ नका,' असे स्पष्ट आवाहन ड. विवेकानंद सानप यांनी केले आहे.

तसेच प्रतिष्ठानच्या नावाने पैसे मागणारी व्यक्ती आढळून आल्यास नागरिकांनी तत्काळ प्रतिष्ठानचे संस्थापक ड. विवेकानंद सानप यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

गरजू रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी निःस्वार्थपणे सुरू असलेल्या या उपक्रमाची बदनामी होऊ नये आणि प्रतिष्ठानच्या नावाचा गैरवापर करून नागरिकांची आर्थिक फसवणूक होऊ नये, यासाठी सर्वांनी सतर्क राहण्याची गरज असल्याचे प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले.संपर्क : ड. विवेकानंद सानप - ९१३००५८८६

या आवाहनाला बबनराव गवते बापू, अविनाश काळे, तुकाराम पवार, प्रा. ज्ञानेश्वर मुंडे, दिलीप गोरे, अशोक धांडे, डॉ. अविनाश देशपांडे, शैलेश लहाने, डॉ. सुरज कोकणे, डॉ. प्रशांत सानप, राम काशीद, ड. सुभाष पिसुरे, डॉ. गणेश वाघमारे, संभाजी मंदे, ड. हनुमान शिंदे आदींनी पाठिंबा देत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी कलावंतांवर आत्मदहनाची वेळ आणली.!

## बीडमधील शेकडो कलावंत तीन वर्षांपासून मानधनापासून वंचित..?




बीड प्रतिनिधी

राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेचा लाभ बीड जिल्ह्यातील कलावंतांना गेल्या तीन वर्षांपासून मिळालेला नाही. कलाकार निवड समितीची बैठकही झालेली नसल्याने संतप्त कलावंतांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्री, अर्थमंत्री, पालकमंत्री व विभागीय आयुक्तांना निवेदन देत आठ ते दहा दिवसांत समितीची बैठक घेऊन मानधन वाटप करावे, अन्यथा सप्टेंबर २०२६ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामूहिक आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

गेल्या तीन वर्षांपासून समितीची बैठक न झाल्यामुळे अनेक ज्येष्ठ वयोवृद्ध, महिला तसेच विधवा कलावंत आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाकडून योजनेसाठी निधी उपलब्ध होत असतानाही लाभार्थी निवड प्रक्रिया रखडल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.कलावंतांनी जिल्हाधिकारी तथा समिती अध्यक्ष आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घेऊन पात्र कलाकारांची निवड करून मानधनाचा लाभ द्यावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आल्याने प्रशासन आता काय भूमिका घेणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.निवेदनावर चंद्रकांत लिंबाजी भालेराव, मोहन रुद्रा दराडे, लक्ष्मण नामदेव खेडकर, अशोक तुकाराम बुरंगे, छाया कोकाटे, महादेव कारभारी खेडकर यांच्यासह इतर कलावंतांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नारळी पौर्णिमेनिमित्त श्री दत्त संस्थान बालाघाट येथे भव्य उत्सव सोहळा

२७ ऑगस्ट रोजी विविध धार्मिक कार्यक्रम, महाप्रसादाचेही आयोजन

मांजरसुंबा प्रतिनिधी

श्री दत्त संस्थान बालाघाट, कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे नारळी पौर्णिमेनिमित्त गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी भव्य धार्मिक उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प.पू. ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

नारळी पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त श्री दत्त संस्थानच्या वतीने भाविक भक्तांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी श्री दत्तांचे दर्शन, पूजा-अर्चा व धार्मिक विधींमध्ये सहभागी होण्यासाठी पंचक्रोशीतील तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. श्रद्धा आणि भक्तीभावाने श्री दत्तांचे दर्शन घेऊन पूजा-अर्चा करण्यासाठी भाविकांना विशेष संधी उपलब्ध होणार आहे. उत्सवासाठी येणाऱ्या भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये, यासाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. अन्नदानाच्या या सेवेसाठी ब्रह्मदेव आश्रुबा शिंदे (कोळवाडी), आश्रुबा केरबा शिंदे (कोळवाडी) आणि लक्ष्मण मारुती जाधव (कपिलधारवाडी) यांनी पुढाकार घेतला आहे. उत्सवातील धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतल्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्री दत्त संस्थान बालाघाट हे परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने नारळी पौर्णिमेच्या उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

नारळी पौर्णिमेचा हा धार्मिक सोहळा सर्व भाविकांसाठी खुला असून, पंचक्रोशीतील नागरिकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री दत्तांचे दर्शन, पूजा-अर्चा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दत्त संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. या



उत्सवाचे नियोजन श्री दत्त संस्थान, बालाघाट यांच्या वतीने करण्यात आले असून, अमोल शिंदे, गणेश शिंदे व समस्त दत्त भक्त परिवार उत्सवाच्या तयारीसाठी परिश्रम घेत आहेत.

# धर्माबाद नगर परिषदेतर्फे सेवानिवृत्त सफाई कामगारांचा निरोप तर वारसांना नियुक्ती आदेश

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद नगर परिषदेतर्फे आस्थापनेवरील सेवानिवृत्त सफाई कामगारांचा निरोप समारंभ तसेच त्यांच्या वारसांना नियुक्ती आदेश प्रदान करण्याचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी दीर्घकाळ नगर परिषदेत सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. संगीता महेश बोलमवाड, मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे, उपनगराध्यक्ष महेश नारायण बोलमवाड, गटनेते ताहेरखान पठाण यांच्यासह सभापती, नगरसेवक, नगर परिषद प्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते.




यावेळी बाबू गणपत मिसाळे, रमेश दत्तू भद्रे, शंकर सटवाजी कांबळे, लक्ष्मीबाई गंगाधर मूरदगे, शकुंतलाबाई नामदेव वासनिकर आणि चंद्राबाई रमेश घाटे या सेवानिवृत्त सफाई कामगारांचा सन्मानपूर्वक निरोप घेण्यात आला.

तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वारसांमध्ये आकाश बाबूराव मिसाळे, दामिनी रमेश भद्रे, अमोल शंकरराव कांबळे, रोहन यशपाल मृदंगे आणि मारुती नामदेव वासनिकर यांना नगर परिषदेतर्फे नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले.

नगर परिषदेच्या स्वच्छता व्यवस्थेत सफाई कामगारांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून, त्यांनी प्रामाणिकपणे व सेवाभावाने बजावलेल्या कर्तव्याचा गौरव यावेळी करण्यात आला. सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या कुटुंबातील वारसांना रोजगाराची संधी मिळाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

दीर्घकाळ केलेल्या सेवेला मनःपूर्वक सलाम. आपल्या सेवाभावाला विनम्र अभिवादन आणि पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा, अशा शब्दांत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## पारसमल शांतीलालजी बोरा यांचे दुःखद निधन, आज उठावणा



बीड प्रतिनिधी

येथील नगर रोडवरील प्रसिद्ध व्यापारी व मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व असलेले पारसमल शांतीलालजी बोरा यांचे सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी दुःखद निधन झाले.त्यांचा अंत्यविधी अमरधाम स्मशानभूमी, बीड येथे करण्यात आला. त्यांच्या निधनाने बोरा परिवार, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच व्यापारी वर्गावर शोककळा पसरली आहे.त्यांचा उठावणा कार्यक्रम बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता स्वाध्याय भवन, जालना रोड, बीड येथे होणार आहे. या दुःखद प्रसंगी सर्व नातेवाईक, मित्रपरिवार व हितचिंतकांनी उपस्थित राहून दिवंगत पारसमलजी बोरा यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन समस्त बोरा परिवार (शिरपूरकर) यांनी केले आहे.

# सामाजिक न्यायाचा निधी वळवणे असंवेदनशील

## निवडणुकीनंतर लाडक्या बहिणींना वगळण्याचा डाव

मुंबई : प्रतिनिधी

सामाजिक न्याय विभागाचा हक्काचा निधी इतर योजनांकडे वळवून सरकार शोषित, वंचित आणि गरीब घटकांवर अन्याय करत असल्याचा घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

सामाजिक न्याय विभागासाठी अर्थसंकल्पात मंजूर केलेला निधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी वापरला जात असल्याबद्दल सुळे यांनी संताप व्यक्त केला. जो शोषित, वंचित आणि दुर्बल घटक आहे, त्याच्या कल्याणासाठी असलेला पैसा काढून घेणे अत्यंत असंवेदनशील आहे. निवडणुका आल्या की अशा योजना जाहीर करायच्या आणि



निवडणुका संपल्या की बजेटअभावी महिलांना वगळायचे, हा निव्वळ फसवणुकीचा प्रकार आहे, असा आरोप त्यांनी केला.

पहिल्या टप्प्यात सुमारे ८० लाख महिलांना केवायसीच्या नावाखाली अपात्र ठरवले जात असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. देशात प्रत्येक वाडी-वस्तीवर जनधन बँक खाती आणि आधार कार्ड पोहोचू शकते, मग लाडक्या बहिणींचे केवायसी का होऊ शकत नाही? हे प्रशासनाचे अपयश असून जाणीवपूर्वक महिलांची संख्या कमी करण्याचा हा डाव आहे, असे सुळे म्हणाल्या.

मूलभूत सुविधांना प्राधान्य द्या

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांच्या विधानाचा दाखला देत त्या म्हणाल्या, कुंभमेळा आणि मोठ्या महामार्गांवर हजारो कोटींची उधळपट्टी केली जात आहे, तर दुसरीकडे मराठी शाळा, आश्रमशाळा आणि रुग्णालयांची दुरवस्था झाली आहे. अमरावती रुग्णालयातील नवजात बालकांचा मृत्यू आणि पुण्या-नाशिकमधील रस्त्यांवरील खड्डे ही वस्तुस्थिती आहे. 'रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता' अशी परिस्थिती असताना सरकारने मोठे 'बिग तिकीट' प्रकल्प करण्यापेक्षा शाळा, आरोग्य केंद्रे, स्थानिक रस्ते आणि पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांवर खर्च करावा.

शेतकरीविरोधी व लहरी निर्यात धोरण

कांदा, साखर आणि तांदळाच्या वाढत्या किमतींवरून केंद्र सरकारला घेरताना त्या म्हणाल्या, शेतक-यांच्या हातात चार पैसे मिळण्याची वेळ आली की केंद्र सरकार निर्यातबंदी किंवा नियमांत बदल करते. कृषी मंत्रालय आणि वाणिज्य मंत्रालयात अजिबात समन्वय नाही. लहरी धोरणांमुळे जागतिक बाजारपेठेत भारताची विश्वासार्हता कमी होते आणि देशातील सामान्य शेतकरी मात्र भरडला जातो. गेल्या १५ दिवसांत सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले असून महागाई प्रचंड वाढली आहे.

## किडनी, यकृत प्रत्यारोपणाच्या सुविधा शासकीय रुग्णालयांत वाढविण्यावर भर द्या – वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई /प्रतिनिधी

राज्यातील गरजू रुग्णांना किडनी व यकृत प्रत्यारोपणाची सुविधा शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध करून देण्यासोबत प्रत्यारोपणाची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने नियोजन करा. यासाठी निधी उपलब्ध करून देवू, आवश्यक पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि तज्ज्ञ वैद्यकीय सेवांचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये किडनी व यकृत प्रत्यारोपणाच्या सुविधांबाबत मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत मंत्री मुश्रीफ बोलत होते. बैठकीला वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, आयुक्त अनिल भंडारी, संचालक पल्लवी सापळे, विविध रूग्णालय आणि महाविद्यालयाचे अधिष्ठाता उपस्थित होते.

# बचत गटाने गोरगरीब महिलांना आर्थिक बळ दिले, नगर परिषद सदैव पाठिशी राहील – नगराध्यक्षा

गेवराई प्रतिनिधी

बचत गटाच्या माध्यमातून गोरगरीब, कष्टकरी कामगार महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी गेवराई ची नगर परिषद नेहमीच खंबीर पणे पाठीशी राहून, बांधिलकी जोपासून काम करत राहील. तसेच, बचत गटाने आयुष्यातील प्रश्नांना उत्तरे देऊन, आत्मसन्मान आणि स्वाभिमानाला एका उंचीवर नेऊन, बचत गटांचा नावलौकिक वाढवू, असे प्रतिपादन नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले.मंगळवार ता. २५ रोजी सकाळी अकरा वाजता नगर परिषदेच्या परीसरात, जिजामाता शॉपिंग मॉल व बचत गटाच्या उत्पादित वस्तूंचा उद्घाटन- प्रदर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या.



व्यासपीठावर सह आयुक्त संभाजी वाघमारे, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, नप उपाध्यक्षा रेवतीताई घुंबार्डे, सभापती आशिया सफियोद्दीन सय्यद यांची उपस्थिती होती. नगराध्यक्षा गीताभाभी पवार यांनी यावेळी बोलताना सांगितले की, महिला सक्षमीकरण काळाची गरज असून, आपल्या कुटुंबासाठी आपण स्वत खंबीर पणे आर्थिक सोर्स उभे केले पाहिजेत. त्यासाठी, महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन, पुढे आले पाहिजे. अशा सर्व महिला बचत गटाला आम्ही कायम सहकार्य करू, पाठिंबा देऊ, असेही त्यांनी सांगून, महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी सामुहिक पणे पुढे यावे असे आवाहन ही नगराध्यक्षा गीताभाभी पवार यांनी केले. यावेळी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, उपनगराध्यक्ष रेवतीताई घुंबार्डे, ड. राजेंद्र राक्षसभुवनकर, सह आयुक्त संभाजी वाघमारे यांची भाषणे झाली. बचत गटाच्या प्रदर्शनात महर्षी वाल्मिकी, रायगड, पांडुरंग, श्रीराम, स्वामी समर्थ, सई, विश्वकर्मा, रुद्राक्ष, स्वामिनी, राजलक्ष्मी महिला बचत गटासह चाळीस महिला बचत गटाने सहभाग घेतला. मनिषा धापसे, माया झेंडेकर , प्रियंका इंगळे, छाया भोसले, रंजना वादे, सुरेखा चव्हाण यांनी प्रयत्न केले

सूत्रसंचालन राघव वाव्हळे,आभार दिनेश औटे यांनी मानले. कार्यक्रमास महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

## बदलत्या हवामानात पारंपरिक वाण ठरणार वरदान

# आदित्य महाविद्यालयात कार्यशाळा, देशी बियाण्यांच्या संवर्धनावर मार्गदर्शन, प्रश्नमंजुषा स्पर्धेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड प्रतिनिधी

बदलते हवामान, रासायनिक खतांचा अतिवापर आणि संकरित वाणांमुळे नामशेष होत असलेल्या देशी बियाण्यांचे जतन करण्याच्या उद्देशाने आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयात 'पारंपरिक/देशी बी-बियाण्यांचे संकलन व संवर्धन : शाश्वत कृषी विकासाचा पाया' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यशाळेत लातूर येथील विलासराव देशमुख कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. योगेश भगत यांनी मार्गदर्शन केले. देशी वाण किडी-रोगांना प्रतिकारक असून कमी पावसातही चांगले उत्पादन देण्याची क्षमता त्यांच्यात आहे. बियाणे संकलन, जतन तंत्रज्ञान व बदलत्या हवामानातील त्यांची उपयुक्तता याबाबत त्यांनी माहिती दिली.




यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व कृषी जैवतंत्रज्ञान शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भावी कृषी पदवीधरांनी देशी वाणांच्या प्रसारासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

कार्यशाळेअंतर्गत 'पारंपरिक बी-बियाणे : संकलन, संवर्धन व प्रसार' या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा झाली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत देशी वाण, त्यांचे भौगोलिक स्थान, औषधी गुणधर्म व संवर्धन तंत्रज्ञानावरील प्रश्नांची अचूक उत्तरे दिली. विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तिपत्रक व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# निःस्वार्थ, निःस्पृह भावनेने पत्रकारांसाठी काम करणारे व्यक्तिमत्त्व : पैलवान संजयजी भोकरे

बीड / वैभव स्वामी

राज्यातील ग्रामीण व शहरी भागात काम करणाऱ्या पत्रकारांना शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत असून अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत. यासाठी राज्य मराठी पत्रकार संघाचे संस्थापक तथा प्रदेश संघटक, दैनिक महानगरी व दैनिक जनप्रवास या दैनिकांचे संपादक तथा अंबाबाई तालिम संस्था मिरज, सांगली या संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त, आमचे मार्गदर्शक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब प्रयत्नशील आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त प्रदेश सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे यांनी घेतलेला त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा...

माननीय पैलवान पत्रकार संजय भोकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पत्रकार बंधूंनी दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रा काढली, ही यात्रा २८ जिल्ह्यांतील २४८ तालुक्यातून मंत्रालयात पोहोचली. पत्रकारांच्या १४ मागण्यांवर मंत्रालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहात मंत्री नामदार मंगल प्रभात लोढा, नामदार चंद्रकांत दादा पाटील, नामदार पंकजाताई मुंडे यांच्या समवेत चर्चा करण्यात आली. पत्रकारांचे आर्थिक विकास महामंडळ व वृत्तपत्र विक्रेत्यांचे महामंडळ स्थापन करावे, या मागणीवर महायुती शासनाने निर्णय घेण्याचे मान्य केले.डिजिटल मीडियाची स्थापना करून नामदार चंद्रकांत दादा पाटील, आमदार जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर यांना आमंत्रित करून डिजिटल मीडियाचे पहिले अधिवेशन माननीय श्री. भोकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या अधिवेशनात डिजिटल मीडियाला मान्यता देण्याची मागणी करण्यात आलेली होती, त्यानुसार शासनाकडून ही मागणी मान्य करण्यात आली.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून भोकरे साहेबांनी नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग नोंदवलेला आहे. कोरोना कालावधीत मृत्यू झालेल्या पत्रकारांना संपादकांकडून आर्थिक मदत देण्यात आली. गुणवंत विद्यार्थी तसेच मान्यवरांचा वर्षभर संघाच्या विविध जिल्ह्यातील शाखांमार्फत गौरव केला जातो. गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले जाते. त्याचबरोबर आपत्तीग्रस्त भागात विविध मदत केली जाते. दीपावली सणानिमित्त मिठाई वाटप, पंढरपूर यात्रेत सहभागी वारकऱ्यांना छत्र्या, रेनकोटचे वाटप इत्यादी उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.पत्रकार संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन दरवर्षी घेतले जाते. यावर्षी माननीय नामदार संजय शिरसाठ, माननीय नामदार अतुल सावे यांना अधिवेशनात आमंत्रित करून पत्रकारांचे प्रश्न शासन दरबारी मांडून हे प्रश्न सोडविण्याची मागणी करण्यात आली.ग्रामीण भागात जोडलेली पत्रकारांची मोटमहाराष्ट्र राज्यापुरतीच मर्यादित न ठेवता गोवा, दिल्ली, बेळगाव, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, ओडिशा इत्यादी ठिकाणी पत्रकार संघाबरोबरच ऑल इंडिया जर्नालिस्ट संघटनेची स्थापना केली व सर्व पत्रकार बंधूंची मूठ बांधली. अनेक ठिकाणी पत्रकार भवन उभे केले. प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होणारे असे हे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व सर्व पत्रकारांच्या गळ्यातील ताईत बनले आहे. राज्यातील बहुसंख्य वर्तमानपत्रांचे संपादक तसेच पत्रकार, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाशी जोडले गेले आहेत. राज्यातील कोकण, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, नागपूर, पश्चिम महाराष्ट्र या भागात संघटनेने सभासदांच्या विविध प्रश्नांवर मोर्चे, आंदोलने उभारून पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, आजत्याला यश मिळालेले आहे. राज्य मराठीपत्रकार संघाच्या माध्यमातून सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी पत्रकार भवन उभारले असून पत्रकारांच्या पाल्यांना शिक्षणात सवलती मिळाव्यात, उच्चशिक्षणातही सवलती मिळाव्यात तसेच राज्य मराठी पत्रकार संघाचा विस्तार विविध राज्यात करण्यासाठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक संजय भोकरे प्रयत्नशील आहेत. या बरोबरच राज्यातील पत्रकारांना देशाच्या राजधानीत थांबण्यासाठी पत्रकार भवन उभारले आहे. पुणे, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर या ठिकाणी देखील पत्रकार संघाच्या सभासदांसाठी पत्रकार भवन उभारले आहे. सभासदांना संघटनेमार्फत पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण, शासकीय विश्राम गृहांवर प्राधान्यक्रम, टोल नाक्यावर सवलत, सभासदांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी राखीव कोटा ठेवण्यासाठी भोकरे साहेब प्रयत्नशील आहेत. अधिस्वीकृतीधारकांनाच राज्य शासनाच्या मोफत रेल्वे, एस. टी., एअरलाईन, शासकीय विश्रामगृहांवर प्राधान्य




दिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील पत्रकारांवर अन्याय होतो. ग्रामीण पत्रकारांना विविध सवलतींचा फायदा देण्याचा प्रयत्न संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे. संघाचे राज्यात विविध ठिकाणी शैक्षणिक उपक्रम सुरू असून सामाजिक नाळ जोडली जात आहे. ग्रामीण भागासह वर्तमानपत्रातील श्रमिक पत्रकार, मुक्त पत्रकार, छायाचित्रकार यांच्या संरक्षणासाठी व संघाने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. संघटना कोणतीही असो मात्र पत्रकारांना संरक्षण, त्यांच्या कार्याची दखल घेणारी संघटना भविष्यात पत्रकारांना तारू शकते, त्यासाठी संघटनामार्फत विभागनिहाय अधिवेशने, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, पत्रकार दिन, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा गुणगौरव उपक्रम सुरू आहेत. गुणवंतांच्या पाठीवर भोकरे साहेब नेहमीच शाबासकी देत आले आहेत. आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक तालुक्यात राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी आणि सभासद आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडविण्याचे काम सातत्याने होत आहे. अनेक पत्रकारांना हलाखीच्या परिस्थितीत पत्रकार संपादकांकडून आर्थिक मदत केली जात आहे. संघाचे सभासदांना अधीस्वीकृत कार्ड मिळवून देण्यासाठी प्रयत्न होत आहेत. समाजातील विविध घटकांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल पत्रकार संघाकडून गौरविण्यात येत आहे. यासाठी मा. भोकरे साहेबांचे मार्गदर्शन मिळत आहे. संघामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार, सांस्कृतिक, पत्रकारिता राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. तसेच राज्यभरात पत्रकारांची मूठ बांधण्यासाठी राज्य संघटक संजय भोकरे साहेबांच्या कल्पक नेतृत्वातून संघटनेचा विस्तार राज्याच्या पलिकडे झाला आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मा. भोकरे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्ट व ध्येयाच्या दिशेने वाटचाल करीत आहे, करीत राहणार आहे. साहेबांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा..!

शब्दांकन...
डॉ.विश्वासराव आरोटे,
प्रदेश सरचिटणीस, म.रा.म.पत्रकार संघ, मुंबई

# बीड मतदारसंघातील मंडळ अधिकारी कार्यालयांच्या इमारतीसाठी निधी आणि क्रीडांगणासाठी जमीन द्या

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे महसूल मंत्र्यांना निवेदन



बीड प्रतिनिधी

तालुक्यातील मंडळ अधिकारी कार्यालयांना स्वतंत्र व हक्काची इमारत नसल्यामुळे नागरिकांना महसुली कामकाजासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी बीड परिसरातील मंडळ अधिकारी कार्यालयांच्या नवीन इमारतींचे बांधकाम आणि दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजुरी, आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच, बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या क्रीडांगणास आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबई येथे मंगळवारी (दि.२५) राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन केली.

यावेळी डॉ.क्षीरसागर यांच्यासह भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, शुभम कातांगळे उपस्थित होते. निवेदनात पुढे म्हटले की, बीड तालुक्यातील अनेक महसूल मंडळ कार्यालयांचे कामकाज सध्या इतर तात्पुरत्या जागांमध्ये सुरू आहे. स्वतंत्र व सुसज्ज इमारतीं अभावी शेतकरी, नागरिक आणि विद्यार्थ्यांना गैरसोयीला सामोरे जावे लागते. याशिवाय प्रशासकीय कामकाज करताना कर्मचाऱ्यांनाही मर्यादा येतात. त्यामुळे तालुक्यातील मंडळ कार्यालयांना हक्काच्या इमारती मिळणे गरजेचे असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

चौकट

या मंडळांसाठी इमारतींची गरज

बीड, पाली, मांजरसुंबा, चौसाळा, लिंबागणेश, घाटसावळी, नाळवंडी, म्हाळसजवळा, चऱ्हाटा, राजुरी (न.), पारगाव सिरस, खालापुरी (ता. शिरूर का.) या मंडळ अधिकारी कार्यालयास नवीन इमारतींची आवश्यकता आहे. तसेच, रायमोहा (ता.शिरूर का.) येथील कार्यालयाची दुरुस्ती करण्याची अत्यंत गरज असून निधी मागणी करण्यात आली आहे.

क्रीडांगणासाठी जमीन उपलब्ध करून द्या

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या क्रीडांगणासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# अंबाजोगाईतील जबरी चोरीचा छडा

## सराईत टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या बेड्या.!

दोन आरोपी जेरबंद, मोटारसायकलसह ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त

बीड प्रतिनिधी

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत छडा लावत दोन आरोपींना जेरबंद केले. त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर प्लस मोटारसायकल व रोख रक्कम असा एकूण ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २८६/२०२६, कलम ३०९(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा व अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांकडून सुरू होता.

दि. २४ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि सुशांत सुतळे, पोहवा मारोती कांबळे, सचिन सानप, रामचंद्र केकान, गोविंद भताने, पोअ सचिन आंधळे व चापोह गणेश मराडे यांनी घटनास्थळी भेट देऊन फिर्यादीकडून माहिती घेतली. आरोपींचा शोध घेत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सैनिक कॉलनी, मोरेवाडी, अंबाजोगाई येथे कारवाई करण्यात आली.

या कारवाईत शिवम जनक कसबे (वय १९, रा. मोरेवाडी, अंबाजोगाई) आणि योगेश हनुमंत शिंपले (वय १८, रा. कुंभेफळ, अंबाजोगाई) यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसी चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्या ताब्यातून मोटारसायकल व रोख रक्कम असा ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यातील आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.



# के.एस.के. महाविद्यालयात देशभक्तीपर गीत गायन संपन्न

बीड प्रतिनिधी

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला, विज्ञान महाविद्यालय व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, राष्ट्रीय कलामंच बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वंदे मातरम् देशभक्तीपर गीत गायन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर व संचालिका डॉ. सारिका ताई क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. योगेश क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व देशप्रेमाची भावना रुजविण्यासाठी असे कार्यक्रम आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. सारिका क्षीरसागर यांनी 'मी सर्वप्रथम भारतीय आहे' ही भावना विद्यार्थ्यांनी जपावी, असे आवाहन केले.

यावेळी केदार सिद्धार्थ, वैष्णवी काळे, कैवल्य सुरवसे, यशवंत घोडेराव, गीतांजली शेळके, ऋतुजा मोगरे, आकांक्षा बडे यांनी देशभक्तीपर गीते सादर केली.कार्यक्रमास प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, डॉ. अनिता शिंदे, शहराध्यक्ष प्रा. जगन्नाथ चव्हाण, देवगिरी प्रांत संघटन मंत्री सिद्धेश्वर लटपटे, विभाग संयोजक आशिष वारे, जिल्हा संघटन मंत्री वैष्णवी लव्हाळे, सहमंत्री नंदिनी रुईकर आदी उपस्थित होते.

सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते भारतमातेची प्रतिमा देण्यात आली. सूत्रसंचालन गीतांजली शेळके हिने, तर आभार प्रा. जगन्नाथ चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.




# शासकीय आदिवासी वसतिगृहांबाबतचा शासन निर्णय रद्द

## आदिवासी विकास विभाग मंत्री डॉ.अशोक वूईके

### विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत वसतीगृह प्रवेशाची वयाची अट रद्द

मुंबई प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींकडून प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करून १४ ऑगस्ट २०२६ रोजीचा शासन निर्णय तसेच त्यानुषंगाने जारी करण्यात आलेली एकत्रित सुधारित नियमावली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेने रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वूईके यांनी दिली.

शासकीय आदिवासी वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा, प्रवेश प्रक्रिया तसेच वसतिगृह व्यवस्थापनाच्या विविध बाबींवर आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वूईके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीस मंत्री नरहरी झिरवळ, आदिवासी खासदार,आमदार,आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे,आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आयुक्त निलेश सागर यावेळी उपस्थित होते.



# संस्कार विद्यालयात कै. चक्रधर दंडे स्मृतिदिनानिमित्त चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

बीड प्रतिनिधी

साने गुरुजींच्या विचारांचे पाईक व संस्कार विद्यालयाचे प्रेरणास्थान कै. चक्रधर दंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त संस्कार विद्यालय माध्यमिक विभागात आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. दि. १८ ऑगस्ट रोजी झालेल्या स्पर्धेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

कार्यक्रमास सतीशजी दंडे, प्रमुख अतिथी कमोडोर राहुलजी जगत (कै. चक्रधर दंडे यांचे नातू), संस्कार प्रबोधिनीचे उपाध्यक्ष भाऊसाहेब बोबडे, संचालक सुनीलजी क्षीरसागर, माजी कलाशिक्षक व परीक्षक क्षीरसागर सर, मुख्याध्यापक घाडगे सर, पर्यवेक्षक तावरे सर तसेच सहभागी शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व कै. चक्रधर दंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्कृत सप्ताहानिमित्त प्रज्ञा खके यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत स्वागतगीत व मंगलाचरण झाले.

कमोडोर राहुल जगत यांनी विद्यार्थ्यांना पाणबुडीची रचना, कार्यपद्धती व भारतीय नौदलातील महत्त्वाची माहिती दिली. तसेच शाळेला पाणबुडीचे मॉडेल व माहितीपर पुस्तक संच भेट दिला. परीक्षक क्षीरसागर सर यांनी चित्रकलेचे महत्त्व सांगून निकाल जाहीर केला.

'भारतीय संस्कृती आणि जीवनशैली' या विषयावरील स्पर्धेत उत्तेजनार्थ कु. जटाळ सिद्धी बद्रीनाथ, चि. म्हेत्रे आदित्य पुरुषोत्तम (शिवाजी विद्यालय, बीड); तृतीय कु. कोठेकर आनंदी बाळनाथ (चंपावती विद्यालय, बीड); द्वितीय कु. मुंदडा तन्वी रामअवतार (द्वारकादास मंत्री राजस्थानी, बीड); तर प्रथम कु. गोरे श्रावणी संतोष (संस्कार विद्यालय माध्यमिक विभाग, बीड) हिने क्रमांक पटकावला. विजेत्यांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

संतोषजी दंडे व भाऊसाहेब बोबडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयोजन मराठी विभागप्रमुख रश्मी पारगावकर व कविता जाधव यांनी केले. प्रास्ताविक सुनंदा कुलकर्णी, तर सूत्रसंचालन व आभार वनिता रत्नपारखी यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# दशनाम गोसावी समाजाच्या राज्यस्तरीय महाअधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-उमेश बन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) दशनाम गोसावी समाज परिषद, महाराष्ट्र राज्य तसेच मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दशनाम गोसावी समाजाचे दुसरे राज्यस्तरीय महाअधिवेशन बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत होणाऱ्या या महाअधिवेशनास महाराष्ट्राच्या विविध भागांतून दशनाम गोसावी समाजातील संत, महंत, मान्यवर, समाजबांधव तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. समाजाच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा, सामाजिक संघटन अधिक बळकट करणे तसेच मराठवाड्यातील इनाम जमीन हक्काच्या प्रश्नाला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, या प्रमुख उद्देशाने या महाअधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे.

दशनाम गोसावी समाजाच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परंपरांना जपत समाजासमोरील विविध प्रश्नांवर संघटितपणे विचारमंथन करण्याची गरज असून, त्यासाठी राज्यस्तरीय पातळीवर समाजबांधवांनी एकत्र येणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या महाअधिवेशनात समाजाच्या विविध अडचणी, प्रलंबित प्रश्न, सामाजिक संघटन, युवकांची भूमिका तसेच समाजाच्या हक्कांसाठी भविष्यातील कार्याची दिशा याबाबत चर्चा होणार आहे. विशेषतः मराठवाड्यातील इनाम जमीन हक्काशी संबंधित प्रश्नांवर व्यापक चर्चा करून समाजबांधवांच्या हक्कांसाठी संघटितपणे पुढील भूमिका निश्चित करण्याच्या दृष्टीने या अधिवेशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.या महाअधिवेशनाच्या निमित्ताने श्री गुरुवर्य महान तपस्वी शिवस्वरूप बन महाराज संजीवन समाधी, श्रीक्षेत्र कासारी, ता. आष्टी, जि. बीड या धार्मिक व सामाजिक परंपरेशी संबंधित कार्यालाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. दशनाम गोसावी समाजाची धार्मिक व सांस्कृतिक परंपरा, संत-महंतांचे योगदान आणि समाजाच्या एकजुटीची परंपरा अधिक दृढ करण्याबरोबरच समाजाच्या हक्कांच्या प्रश्नांवर संघटित आवाज निर्माण करण्याचा प्रयत्न या अधिवेशनातून केला जाणार आहे.






या राज्यस्तरीय महाअधिवेशनाच्या आयोजनात उमेश बन, तालुका अध्यक्ष, आष्टी, रामनाथ (तात्या) बन, मार्गदर्शक, गणेश गोसावी, मार्गदर्शक, ज्ञानेश्वर बन, युवा अध्यक्ष तसेच राजेंद्र पुरी, अहिल्यानगर प्रभारी यांची प्रमुख भूमिका आहे. राज्यभरातील समाजबांधवांपर्यंत अधिवेशनाचा संदेश पोहोचवून त्यांना मोठ्या संख्येने सहभागी करून घेण्यासाठी आयोजकांकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.समाजाची संघटनात्मक ताकद वाढविणे, समाजातील विविध घटकांमध्ये समन्वय निर्माण करणे, सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचे जतन करणे आणि समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर एकत्रितपणे आवाज उठविणे, या उद्देशाने हे महाअधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. इनाम जमीन हक्काचा प्रश्न हा मराठवाड्यातील समाजबांधवांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याने त्यावर अधिवेशनात होणाऱ्या चर्चेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. समाजाच्या प्रश्नांवर केवळ चर्चा न करता त्यासाठी संघटितपणे पुढील दिशा ठरविण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, नगर रोड येथे बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सुरू होणाऱ्या या महाअधिवेशनास सर्व संत, महंत, मान्यवर, समाजातील ज्येष्ठ नागरिक, युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि समस्त दशनाम गोसावी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. समाजाच्या एकजुटीचे आणि संघटनशक्तीचे दर्शन घडवून हे राज्यस्तरीय महाअधिवेशन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन आष्टी तालुका अध्यक्ष उमेश बन यांच्यासह आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## दु:खद प्रसंगामुळे माजी आ.बाळासाहेब आजबे यांचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या अकाली निधनामुळे तसेच आपले ज्येष्ठ बंधू स्व. विलास आबा आजबे यांच्या दुःखद निधनाने मन व्यथित झाल्याने माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी यंदा आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी २८ ऑगस्ट रोजी बाळासाहेब आजबे यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व स्तरांतून मित्रपरिवार, सहकारी, हितचिंतक व कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात. विविध माध्यमांतून शुभेच्छा संदेश देत त्यांच्याप्रती असलेले प्रेम, आपुलकी व जिव्हाळा व्यक्त केला जातो. या सर्वांच्या शुभेच्छा व आशीर्वादाबद्दल आपण सदैव ऋणी असल्याची भावना माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी व्यक्त केली आहे. मात्र, यंदा राष्ट्रवादी काँग्रेस परिवारावर आलेले दुःखद संकट आणि त्याचबरोबर ज्येष्ठ बंधू स्व. विलास आबा आजबे यांच्या दुःखद निधनामुळे वाढदिवस साजरा करणे योग्य वाटत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे २८ ऑगस्ट रोजी कोणत्याही प्रकारचा वाढदिवसाचा कार्यक्रम आयोजित न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. तसेच आपल्या सर्व सहकारी, मित्रपरिवार, कार्यकर्ते व हितचिंतकांनी वाढदिवसानिमित्त बॅनरबाजी, जाहिराती किंवा इतर कोणत्याही प्रकारचा अनावश्यक खर्च करू नये, अशी नम्र विनंतीही त्यांनी केली आहे.



दुःखद प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्वांनी आपल्या भावनांचा आदर करावा आणि वाढदिवसानिमित्त होणारा खर्च टाळावा, असे आवाहन माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी केले आहे. दरवर्षी मिळणारे प्रेम, शुभेच्छा आणि आशीर्वाद हेच आपल्यासाठी मोठे समाधान असून, यंदाच्या परिस्थितीत प्रत्यक्ष वाढदिवस साजरा करण्याऐवजी सर्वांनी या निर्णयाला सहकार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्या या निर्णयामुळे स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाचे तसेच स्व. विलास आबा आजबे यांच्या दुःखद निधनाचे गांभीर्य आणि त्यांच्या स्मृतीप्रती असलेली आदराची भावना अधोरेखित झाली आहे. त्यामुळे २८ ऑगस्ट रोजी वाढदिवसानिमित्त कोणतीही बॅनरबाजी अथवा जाहिरात न करता त्यांच्या निर्णयाचा सन्मान करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ३७ वर्षांनंतर हिराबाईंच्या उजव्या हाताला मिळाली नवी ताकद

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी झालेल्या अपघातात उजवा हात गमावलेल्या ३७ वर्षीय हिराबाई हरिभाऊ गायकवाड यांच्या आयुष्यात तब्बल ३७ वर्षांनंतर नव्या आशेचा किरण उजाडला आहे. आष्टी येथे आ. सुरेश आण्णा धस यांच्या वतीने ५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून हिराबाई यांना अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात मिळाला असून, त्यामुळे त्यांना पुन्हा दोन्ही हातांचा वापर करून दैनंदिन कामे करता येऊ लागली आहेत. महाआरोग्य शिबिर त्यांच्या जीवनाला नवी दिशा देणारे आणि आत्मविश्वास वाढविणारे ठरले आहे.

हिराबाई हरिभाऊ गायकवाड सध्या अहिल्यानगर येथे स्थायिक आहेत. वयाच्या दहाव्या वर्षी झालेल्या अपघातामुळे त्यांचा उजवा हात निकामी झाला होता. त्यानंतर तब्बल ३७ वर्षे त्यांनी एका हातानेच आपले दैनंदिन जीवन जगत अनेक अडचणींवर मात केली. घरातील कामे तसेच इतर दैनंदिन व्यवहार करताना त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र परिस्थितीशी जुळवून घेत त्यांनी आजवर जीवनाचा संघर्ष सुरू ठेवला.




दरम्यान, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिराची माहिती माजी नगरसेवक तथा आ. सुरेश धस यांचे सहकारी कार्यकर्ते दीपक भाऊ निकाळजे यांनी हिराबाई गायकवाड यांना दिली. त्यांच्या परिस्थितीची माहिती घेऊन दीपक भाऊ निकाळजे यांनी हिराबाई यांना आष्टी येथे शिबिरात आणण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या येण्या-जाण्याचा खर्चही त्यांनी केला. त्यामुळे हिराबाई यांना महाआरोग्य शिबिरात सहभागी होता आले.

शिबिरात हिराबाई यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. त्यांच्या प्रकृतीची व गरजेची माहिती घेतल्यानंतर पुढील उपचाराची प्रक्रिया पुणे येथे करण्यात आली. त्यानंतर त्यांना अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात बसविण्यात आला. हा कृत्रिम हात दैनंदिन कामकाजासाठी उपयोगी ठरत असून, त्याच्या मदतीने हिराबाई यांना पूर्वीपेक्षा अधिक सहजपणे विविध कामे करता येत आहेत.

तब्बल ३७ वर्षांनंतर उजव्या हाताचा उपयोग करता येऊ लागल्याने हिराबाई यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून येत आहे. एका हाताने जीवन जगताना ज्या अडचणींचा सामना करावा लागला, त्या तुलनेत आता दोन्ही हातांचा वापर करता येत असल्याने त्यांच्या आत्मविश्वासात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे महाआरोग्य शिबिर केवळ तपासणी आणि उपचाराचे माध्यम न राहता एका गरजू महिलेच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारे ठरले आहे.

आपला अनुभव सांगताना हिराबाई हरिभाऊ गायकवाड म्हणाल्या, माझ्या उजव्या हाताला पुन्हा ताकद मिळाली. दहा वर्षांची असताना झालेल्या अपघातात माझा उजवा हात निकामी झाला होता. अनेक वर्षे मी एका हातानेच काम करत होते. आष्टीतील महाआरोग्य शिबिरामुळे मला उपचाराची संधी मिळाली आणि आज मला इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात मिळाला आहे. आता मी डाव्या हाताप्रमाणेच उजव्या हातानेही काम करू शकत आहे. माझ्या आयुष्यात पुन्हा आत्मविश्वास आणि आनंद आणल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, आ. सुरेश आण्णा धस साहेब आणि दीपक भाऊ निकाळजे यांचे मनःपूर्वक आभार.

महाआरोग्य शिबिराचा उद्देश केवळ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यापुरता मर्यादित नसून, गरजू रुग्णांना त्यांच्या आजारानुसार पुढील उपचार, आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि शक्य तेवढी मदत उपलब्ध करून देणे हा आहे. हिराबाई गायकवाड यांना मिळालेल्या कृत्रिम हाताच्या माध्यमातून या उपक्रमाचा सामाजिक व मानवी चेहरा अधोरेखित झाला आहे.

३७ वर्षे एका हाताने जीवन जगल्यानंतर पुन्हा उजव्या हाताचा उपयोग करता येणे ही हिराबाई गायकवाड यांच्यासाठी केवळ वैद्यकीय सुविधा नसून त्यांच्या आयुष्यातील एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. त्यांच्या जीवनातील ही सकारात्मक घडामोड महाआरोग्य शिबिरामुळे गरजू व्यक्तींना मिळणाऱ्या मदतीचे प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे. महाआरोग्य शिबिरातून उपचारच नव्हे, तर नव्या आयुष्याची उमेद मिळाली, ही हिराबाईंची भावना या संपूर्ण उपक्रमाचे खरे सार सांगणारी ठरते.

# सीना प्रकल्पातून आष्टी तालुक्यातील टँकरग्रस्त गावांना मोठा दिलासा

## आ.सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील टँकरग्रस्त गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. सीना मध्यम प्रकल्पातून सध्या ३१० क्युसेक क्षमतेने पाण्याचा विसर्ग करण्यात येत असून, त्यामुळे आष्टी तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त व टँकरग्रस्त गावांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

कुकडी प्रकल्पातून भोसे खिंडमार्गे सीना मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्यात येते. मात्र यापूर्वी सीना प्रकल्पातून पुढे जाणाऱ्या पाण्याचा विसर्ग २०० क्युसेकपेक्षा कमी असल्याने अपेक्षित प्रमाणात पाणी पुढील भागात पोहोचत नव्हते. परिणामी आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. काही गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आली होती.

ही परिस्थिती लक्षात घेऊन आ. सुरेश धस यांनी संबंधित जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सीना कालव्यातून



पुरेशा क्षमतेने पाणी सोडण्याबाबत सातत्याने पाठपुरावा केला. तसेच सीना कालव्याच्या कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधून आवश्यक त्या सूचना दिल्या.

दरम्यान, सीना कालव्याच्या प्रवाहात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाण्याचा प्रवाह बाधित होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रकल्पातून अपेक्षित क्षमतेने पाणी पुढे जाण्यास अडथळे निर्माण होत होते. ही बाब लक्षात घेऊन संबंधित यंत्रणेकडून कालव्यातील अडथळे दूर करण्यासाठी उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्यानंतर सीना प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग वाढवून ३१० क्युसेक करण्यात आला आहे. त्यामुळे सीना प्रकल्पालगतच्या गावांसह आष्टी तालुक्यातील टँकरग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान कुकडी धरणातून सीना प्रकल्पाकडे ४०० क्युसेक क्षमतेने पाण्याचा विसर्ग करण्यात येणार असल्याची माहिती आहे. कुकडी प्रकल्पातून सोडण्यात येणारे हे पाणी सीना प्रकल्पात दाखल झाल्यानंतर सीना प्रकल्पातील पाणी तातडीने मेहकरी प्रकल्पाकडे सोडण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील सीना प्रकल्पालगतच्या गावांचा तसेच टँकरद्वारे सुरू असलेल्या पिण्याच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे. पाण्याचा प्रवाह वाढल्याने टंचाईग्रस्त गावांना आवश्यक पाणी उपलब्ध होण्याची शक्यता असून, नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी जलस्रोतांचा योग्य वापर, कालव्यांची स्वच्छता आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर आ. सुरेश धस यांनी प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधून केलेल्या पाठपुराव्यामुळे सीना प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

आष्टी तालुक्यातील पाणीटंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी आ. सुरेश धस यांनी केलेल्या या प्रयत्नांमुळे टँकरग्रस्त गावांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. कुकडी धरणातून होणारा वाढीव पाण्याचा विसर्ग आणि सीना प्रकल्पातून पुढे सोडण्यात येणारे पाणी यामुळे आगामी काळात आष्टी तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अनिषा ग्लोबल स्कूलमध्ये स्टुडंट-लेड कॉन्फरन्स उत्साहात

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) अनिषा ग्लोबल स्कूलमध्ये सौ. प्राजक्ता धस यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली 'स्टुडंट-लेड कॉन्फरन्स'चे मंगळवारी उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या या अभिनव उपक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या परिषदेत विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक विषयांवर आधारित प्रकल्प, मॉडेल्स आणि सादरीकरणांच्या माध्यमातून आपले ज्ञान, कल्पकता तसेच शिकण्याचा अनुभव पालक आणि उपस्थितांसमोर आत्मविश्वासाने मांडला.



## विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला मिळाले नवे व्यासपीठ

आपल्या प्रकल्पांची माहिती स्वतः समजावून सांगताना विद्यार्थ्यांनी प्रभावी संवादकौशल्य, सर्जनशीलता, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि विषयाचे सखोल आकलन यांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. विशेष म्हणजे या उपक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याचा १०० टक्के सहभाग हे सर्वाधिक कौतुकाचे वैशिष्ट्य ठरले. केवळ शैक्षणिकदृष्ट्या प्रगत विद्यार्थ्यांपुरतेच कौशल्य प्रदर्शन मर्यादित न ठेवता प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे विषय, प्रकल्प आणि कल्पना स्वतःच्या शब्दांत मांडण्याचे व्यासपीठ मिळाले.

पालकांसमोर सादरीकरण करताना विद्यार्थ्यांनी कोणताही संकोच न बाळगता आपल्या प्रकल्पांची माहिती दिली तसेच उपस्थितांच्या प्रश्नांना आत्मविश्वासाने उत्तरे दिली. विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या उपक्रमातून अनिषा ग्लोबल स्कूलची विद्यार्थी-केंद्रित आणि अनुभवाधारित शिक्षणपद्धती प्रकर्षाने अधोरेखित झाली.

केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याऐवजी प्रत्यक्ष कृती, प्रयोग, प्रकल्प आणि सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करावे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा आणि आत्मविश्वासाने ते इतरांसमोर मांडावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जबाबदारीची भावना, सर्जनशील विचार, समस्या सोडविण्याची क्षमता आणि प्रभावी संवादकौशल्य विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे या परिषदेतून स्पष्ट झाले. प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी देण्याच्या शाळेच्या समावेशक दृष्टिकोनाचे पालकांनी विशेष कौतुक केले.

आपल्या पाल्याने स्वतःच्या प्रकल्पाचे सादरीकरण करताना दाखविलेला आत्मविश्वास, विषयाचे आकलन आणि संवाद साधण्याची पद्धत पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य देणाऱ्या शाळेच्या कार्यपद्धतीबद्दल पालकांनी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील प्रकल्प आणि मॉडेल्स सादर करताना त्यामागील संकल्पना, कार्यपद्धती आणि त्याचा उपयोग याबाबत माहिती दिली. त्यामुळे पालकांनाही आपल्या मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतः तयारी करून सादरीकरण केल्याने त्यांच्यात स्वावलंबनाची आणि जबाबदारीची भावना निर्माण होण्यास मदत झाली. सौ. प्राजक्ता धस यांच्या मार्गदर्शनाखाली अनिषा ग्लोबल स्कूलकडून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असून 'स्टुडंट-लेड कॉन्फरन्स' हा त्यातील महत्त्वाचा उपक्रम ठरला. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेच्या चौकटीत न ठेवता त्यांच्या अंगभूत कलागुणांना, कल्पनाशक्तीला आणि नेतृत्वक्षमतेला वाव देण्याचा शाळेचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला.

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या शिकण्याची जबाबदारी स्वीकारून ती इतरांसमोर प्रभावीपणे मांडल्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासाला मोठी चालना मिळाली. पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील संवाद वाढविण्याच्या दृष्टीनेही ही परिषद उपयुक्त ठरली. पालकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत शाळेच्या या अभिनव उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. शिक्षण ही केवळ गुण मिळविण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी आणि त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम करणारी प्रक्रिया आहे, याचा प्रत्यय या उपक्रमातून आला.

एकंदरीत, विद्यार्थ्यांचा १०० टक्के सहभाग, पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे अनिषा ग्लोबल स्कूलमधील 'स्टुडंट-लेड कॉन्फरन्स' अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला नवे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमातून त्यांच्या ज्ञानासोबतच सर्जनशीलता, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना

# शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल गणेश गोसावी यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कासारी, ता. आष्टी, जि. बीड येथील कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक गणेश गोसावी यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. दशनाम गोसावी समाज परिषद (बीड), महाराष्ट्र राज्य व मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय महाअधिवेशन-२०२६ मध्ये त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



गणेश गोसावी यांनी आपल्या शैक्षणिक सेवेत ग्रामीण भागातील शाळा आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. कासारी येथे कार्यरत होण्यापूर्वी त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सरदवाडी येथे केलेल्या उल्लेखनीय कार्यातून शाळेच्या शैक्षणिक, भौतिक आणि सामाजिक विकासाचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सरदवाडी शाळा जिल्ह्यातील पहिली प्राथमिक आयएसओ मानांकन प्राप्त शाळा म्हणून घडविण्यात आली. तसेच या शाळेला राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त झाला असून, त्यामध्ये गणेश गोसावी यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.

'३६५ दिवस चालणारी शाळा' ही संकल्पना प्रभावीपणे राबवत त्यांनी शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध केले. विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत सातत्य राहावे, अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी आणि गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी 'दिनांकाचा पाढा', 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा' यांसह विविध उपक्रम त्यांनी राबविले. शिष्यवृत्ती परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नियोजनबद्ध अभ्यासक्रम व सरावाचे नियोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि व्यक्तिमत्त्व विकास साधला जावा, यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञानापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळावे, यासाठी ऐतिहासिक व भौगोलिक शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, निरीक्षणशक्ती, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळाली. विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीचे महत्त्व समजावे, संस्कार व सांस्कृतिक जाणीव रुजावी, यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.शाळेच्या भौतिक विकासासाठी लोकसहभागाचे महत्त्व ओळखून गणेश गोसावी यांनी ग्रामस्थ, पालक व शिक्षणप्रेमी यांना शाळेच्या विकासाशी जोडले. सरदवाडी शाळेसाठी सुमारे १५ लाख रुपयांचा लोकवाटा व लोकसहभाग जमा करून शाळेच्या भौतिक सुविधांचा विकास करण्यात आला. कासारी शाळेतही सुमारे १ लाख २० हजार रुपयांचा लोकसहभाग मिळवून विविध भौतिक गरजा पूर्ण करण्यात आल्या. 'गावाचा शाळेला आधार आणि शाळेला गावाचा अभिमान' ही संकल्पना त्यांनी प्रभावीपणे रुजवून शाळा आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ केले.

सध्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कासारी येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना त्यांनी शाळेची गुणवत्ता वाढविण्यासोबतच विद्यार्थ्यांची उपस्थिती व शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. उपलब्ध शालेय सुविधांचा विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देत शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच शाळेच्या सर्वांगीण विकासावर त्यांनी भर दिला. कासारी शाळेच्या शालेय परसबाग निर्मितीला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून देण्यातही त्यांच्या प्रयत्नांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास आणि जिज्ञासा निर्माण व्हावी, शाळांचा विकास लोकसहभागातून व्हावा आणि शिक्षणामध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची सांगड घातली जावी, या उद्देशाने गणेश गोसावी यांनी केलेल्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना जाहीर झालेला राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा गौरव मानला जात आहे.

या पुरस्कारामुळे सरदवाडी, कासारी तसेच संपूर्ण बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी आणि विविध स्तरांतून मुख्याध्यापक गणेश गोसावी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# सेवारत सैनिक किशोर वाघमारे यांच्यावर कळमआंबा येथे शाही इतमामात अंतिम संस्कार

बीड (जि. मा. का.)

देशाची सेवा करत असताना उपचारा दरम्यान निधन झालेले सेवारत सैनिक गनर किशोर लक्ष्मण वाघमारे यांच्यावर त्यांच्या मूळ गावी कळमआंबा (ता. केज, जि. बीड) येथे शासकीय व शाही इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले.

कळमआंबा येथील रहिवासी असलेले सैनिक किशोर वाघमारे हे गेल्या ८ वर्षांपासून सैन्यदलात सेवेमध्ये कार्यरत होते. आजारावरील उपचारासाठी त्यांना कमांड हॉस्पिटल, पुणे येथे दाखल करण्यात आले होते. तेथे उपचार सुरू असताना २२ ऑगस्ट २०२६ रोजी अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले.त्यानंतर २३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी त्यांच्या मूळ गावी कळमआंबा येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस दलातर्फे 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन मानवंदना देण्यात आली. तसेच प्रशासनाच्या वतीने केजचे तहसीलदार, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी आणि युसूफवडगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांनी पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी,



## रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम या पुढेही सुरु राहणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्रात रिक्षा व टॅक्सी चालविणाऱ्या अमराठी चालकांना प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या उद्देशाने परिवहन विभागाच्या सामाजिक बांधिलकीतून राबविलेल्या १०५ दिवसांच्या विशेष उपक्रमाद्वारे राज्यातील सुमारे १ लाख ६५ हजार ८०० रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. हा उपक्रम या पुढेही सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेस कामगार नेते शशांक राव तसेच कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.मुंबई आणि ठाणे

**रोजगार हिरावून घेणारे नव्हे, रोजगार देणारे शासन,अफवांवर विश्वास ठेवू नका**

परिसरातील वातावरण बिघडविण्याचा काही समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचे सांगून मंत्री सरनाईक यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. रिक्षा-टॅक्सी संघटनांचे पदाधिकारी आणि नेत्यांशी शासन सातत्याने संवाद साधत असून, त्यांच्या सूचनांचा विचार करून कोणावरही चुकीच्या पद्धतीने कारवाई होणार नाही, अशी शासनाची भूमिका असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी शेवटी सांगितले.

# मराठी शाळा वाचवा व केजी ते पीजी शिक्षण मोफत द्या आदि मागण्यांसाठी १ सप्टेंबर रोजी रानबा गायकवाड यांचे उपोषण

### आमदार खासदार लोकप्रतिनिधींसह नोकरदारांची मुले मराठी शाळेतच घालण्याची मागणी

परळी प्रतिनिधी. मराठी शाळा वाचवा व के.जी.ते पीजी शिक्षण मोफत मिळावे यासह राज्यातील सर्व आमदार ,खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी व शासकीय,निमशासकीय नोकरदारांची मुले मराठी शाळेतच घालावीत, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृतीत वाढ करावी आदी प्रमुख मागण्यासाठी जेष्ठ पत्रकार व साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते रानबा गायकवाड हे येत्या १ सप्टेंबर रोजी परळीत उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषणाला बसणार आहेत.




याबाबत रानबा गायकवाड यांनी नुकतेच उपविभागीय अधिकारी व परळीचे तहसिलदार यांना निवेदन दिले आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की,फुले, शाहू ,आंबेडकरांच्या महाराष्ट्रात सर्वसामान्यांना मिळणारे शिक्षण दिवसेंदिवस महाग व दुरापास्त होत चालले आहे.राज्य सरकारने हजारो मराठी शाळा पटसंख्येच्या नावाखाली बंद केल्या आहेत.त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण बंद पडले आहे.तसेच अनेक मराठी शाळांचे खाजगीकरण करून त्या उद्योगपतींना चालविण्यासाठी दिलेल्या आहेत.शिक्षणाचे सार्वत्रिककरणाकडून खाजगीकरणाकडे अशी सरकारने वाटचाल सुरू केली आहे ही संविधान विरोधी आहे.तसेच मोफत शिक्षण देण्याच्या सरकारच्या धोरणांच्या विरोधात आहे.

शिक्षण हे सर्वसामान्य, गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी कामगार, उपेक्षित समाजासाठी , त्यांच्या प्रगतीसाठी आजही आवश्यक आहे.इंग्रजी शाळांचा सुळसुळाट आणि त्यांच्या लाखो रुपयांच्या फीसमुळे राज्यात शिक्षणाचा बाजार झाला आहे.बहुतेक शाळा या राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांच्या असल्याने जाणीवपूर्वक महानगर पालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका आदी सरकारी शाळा बंद पाडल्या जात आहेत.शिक्षकांना जाणीवपूर्वक इतर कामांत गुंतविले गेले आहे.नवीन शिक्षक भरती केली जात नाही.तसेच हजारो शाळांच्या इमारती पडक्या व धोकादायक अवस्थेत आहेत.

जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा नाहीत.चांगल्या शाळांच्या इमारती नाहीत यास सर्वस्वी राज्य सरकार जबाबदार आहे.मराठी शाळा वाचविण्यासाठी तसेच सर्वसामान्य बहुजन समाजाला के.जी.ते पी.जी.शिक्षण मोफत मिळावे, राज्यात यापुढे नवीन इंग्रजी शाळांना परवानगी देऊ नये, मराठी शाळा वाचविण्यासाठी महाराष्ट्रातील आमदार ,खासदार , मंत्री मंडळातील सर्व मंत्र्यांचे मुले,नगरसेवक, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, राज्यातील शासकीय निमशासकीय कर्मचारी यांच्या मुलांना सरकारी मराठी शाळेतच शिक्षण घेण्याचा महाराष्ट्र सरकारने कायदा करावा, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मध्ये वाढ करावी, सर्व स्पर्धा परीक्षा पारदर्शकपणे घ्याव्यात , राज्य सरकारने शिक्षणावरील खर्चात वाढ करावी आदी मागण्यांसाठी दिनांक १ सप्टेंबर २०२६ मंगळवार रोजी परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर रानबा गायकवाड उपोषणाला बसणार आहेत. निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव झिलमेवाड व पत्रकार विकास वाघमारे यावेळी उपस्थित होते.

# अनिल अक्रूर गिरी यांचा 'शिववंशीय योद्धा पुरस्कार' देऊन सन्मान

बीड (प्रतिनिधी) : शिववंशीय दशनाम गोसावी समाज संस्थेच्या वतीने गोसावी समाजातील ज्येष्ठ समाजसेवक तथा शिववंशीय दशनाम संस्थेचे बीड जिल्हा युवा अध्यक्ष श्री. अनिल अक्रूर गिरी यांना पुणे येथे प्रतिष्ठेचा 'शिववंशीय योद्धा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या वधू-वर परिचय मेळाव्याच्या समारंभात राज्यातील गोसावी समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात आला. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर, शिवव्याख्याते प्रा. यशवंत गोसावी, ह.भ.प. अविनाश भारती, शिवसंभा दादा गोसावी आणि सूर्यकांत धर्मा गिरी गोसावी यांच्या हस्ते अनिल अक्रूर गिरी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




बीड जिल्ह्यात सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय राहून समाजाच्या विविध प्रश्नांसाठी पुढाकार घेणारे अनिल गिरी हे कृतीशील व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला.

पुरस्कार मिळाल्याबद्दल बीड शिववंशीय समाज संस्थेच्या वतीने तसेच समाजबांधवांकडून अनिल गिरी यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.या स्वागत व अभिनंदन कार्यक्रमास गंगाधर भाऊ पुरी (महाराष्ट्र राज्य कोषाध्यक्ष तथा मराठवाडा अध्यक्ष), दादासाहेब गिरी, महेंद्र पुरी, मार्गदर्शक नारायण महाराज गिरी, कवी श्री. राम गिरी सर, श्री. मानिक पुरी सर, श्री. उतरेश्वर भारती सर, श्री. भागवत भारती सर, श्री. नंदकिशोर गिरी सर, श्री. लहू पुरी सर (गुरुमाऊली बचतगट सचिव), श्री. नाना पर्वत, श्री. गोरख पुरी (बीड जिल्हा उपाध्यक्ष), श्री. जनार्धन गिरी (बीड तालुका अध्यक्ष), श्री. राम भारती (शहर अध्यक्ष), श्री. अमर पुरी सर, श्री. भारत गिरी, श्री. राजेंद्र गिरी, श्री. राजेंद्र पुरी, गेवराई तालुका अध्यक्ष दत्ता गिरी, मच्छिंद्र बन, विनायक गिरी, विक्रम गिरी, अंबादास गिरी, श्री. धनंजय गिरी, श्री. नारायण गिरी, श्री. युवराज गिरी, श्री. अनिकेत गिरी, श्री. अशोक गिरी, श्री. शुभम गिरी, श्री. दत्ता पुरी आदी मान्यवर उपस्थित होते.समाजसेवेची ही वाटचाल अशीच अविरत सुरू राहो आणि त्यांच्या कार्याला यापुढेही व्यापक यश मिळो, अशा शुभेच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# शिक्षण क्षेत्रात अल्पावधीतच नावाजलेल्या शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी विजय रापतवार यांची फेरनिवड

उपाध्यक्ष पदी अशोक पोपळघट तर बाळासाहेब माने यांनी सचिवपदी निवड

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- येथील शिक्षण क्षेत्रात अल्पावधीतच अत्यंत प्रतिष्ठा मिळवलेल्या शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी विजय रापतवार यांची फेरनिवड करण्यात आली आहे. प्रतिष्ठाण ची नुकतीच वार्षिक सर्वसाधारण बैठक संपन्न झाली. या बैठकीत मागील वर्षभरात प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेल्या विविध सामाजिक , शैक्षणिक व अन्य क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची मुदत संपल्यामुळे पुढील काळासाठी नवीन कार्यकारिणी तयार करण्यात आली. यामध्ये शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई अध्यक्षपदी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विजय रापतवार यांची बिनविरोध फेर निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी अशोक पोपळगट व सचिव म्हणून बाळासाहेब माने, सहसचिव पदासाठी शेख आरिफ तसेच कोषाध्यक्ष पदी बबनराव घुले, मुख्य सल्लागार म्हणून विष्णू सरवदे, उमेश नाईक व दत्ता देवकते यांची एक मताने निवड झाली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडी बद्दल त्यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.





विजय रापतवार यांच्या संकल्पनेनुसार शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणची निर्मिती मागील दहा वर्षांपूर्वी करण्यात आली. यामध्ये अंबाजोगाई तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी त्याचबरोबर जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी व त्या सुधारून जिल्हा परिषद शिक्षण क्षेत्र इतर खाजगी शाळांच्या शिक्षणासोबत आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यात प्रतिष्ठाण काही अंशी का होईना यश मिळत आहे.

कोव्हिड काळात प्रतिष्ठाणने गरजूंना अन्नधान्याची किट, हातमोजे, सॅनिटायझर याचे वाटप केले होते. जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी गेली चार ते पाच वर्षांपासून सामान्यज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात येत आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचा देखील उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळतो आहे. या स्पर्धेतील विजेत्याना रोख रक्कम बक्षीस म्हणून वितरित करण्यात येत आहे. त्याचबरोबर प्रतिष्ठाण च्या वतीने नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवांचा सेवासन्मान सोहळा देखील मोठया प्रमाणावर साजरा करण्यात येऊन त्या कर्मचाऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात येते. असा प्रकारच्या सामाजिक तथा शैक्षणिक उपक्रमांमुळे अत्यंत अल्पावधीतच शिक्षक मैत्री प्रतिष्ठाण हे शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत प्रतिक्षेचे बनल्याचे दिसून येत आहे.

# २९ ऑगस्ट रोजी अंबाजोगाईत जोगवा यात्रेचे आगमन

### सोयाबीन गोड तेलाचा जोगवा वाढून सहकार्य करण्याचे आवाहन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री क्षेत्र तुळजापूर येथे होणाऱ्या भव्य श्री दत्त-दुर्गा महाअनुष्ठान कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या जोगवा यात्रेचे आगमन २९ ऑगस्ट रोजी अंबाजोगाईत होणार आहे. सोयाबीन गोड तेलाचा जोगवा वाढून सहकार्य करण्याचे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

गुरुतत्त्व प्रदीप आयोजित श्री दत्त - दुर्गा महाअनुष्ठानम (श्री क्षेत्र तुळजापूर) येथे दि. ३० ऑक्टोबर २०२६ ते ६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. जय जगदंब व श्री गुरुदेव दत्त या जयघोषात हा सोहळा होणार आहे.

या ८ दिवस चालणाऱ्या अनुष्ठानात पाच प्रमुख धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. १००८ श्री गुरुचरित्र सारामृत पारायण,पंच कुण्डात्मक सहस्रचंडी याग, सहस्र सत्यांबा पूजन, सहस्र सवर्णींचे सौभाग्य अलंकार पूजन,लक्ष भोजन.हा सर्व कार्यक्रम श्री स्वामी महाराज व आई जगदंबेच्या आदेशाने जोगवा मागून संपन्न करण्याचे ठरविले आहे.या ईश्वरीय कार्याची पूर्तता होण्यासाठी गावोगावी जोगवा यात्रा काढण्यात आली आहे. जोगवा हा मुख्यत्वे सकाम कार्याकरिता मागितला जातो. परंतु वरील ईश्वरीय कार्य हे वैश्विक असल्याकारणाने ही जोगवा यात्रा दीर्घकालीन ठरविली आहे. जोगवा मागण्यामागील कार्यकारण भाव ध्यानी धरून सत्वपात्रतेने सोयाबीन गोडतेलाचा जोगवा वाढून या उपक्रमात सहभाग नोंदवावा.व या कार्याचे कार्यवाहक व्हावे. अशी विनंती आयोजकांनी केली आहे.संपूर्ण बीड जिल्ह्याची नियुक्ती सोयाबीन गोडतेल जोगव्यासाठी करण्यात आली आहे.तरी सर्वांनी जोगवा सोयाबीन गोडतेलाचाच वाढावा.असे आवाहन समस्त हिंदू समाज, अंबाजोगाई यांच्यावतीने करण्यात आले आहे.

अंबाजोगाई शहरात स्वागत:अंबाजोगाई शहरात या जोगवा यात्रेचे भव्य स्वागत शनिवार दिनांक २९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आण्णा भाऊ साठे चौक येथे करण्यात येणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. हि जोगवा यात्रा श्री दत्त संस्थान, धाकटे देवघर, देशपांडे गल्ली, अंबाजोगाई येथे थांबणार आहे.

# निकृष्ट कामामुळे सहा महिन्यातच डांबरीरस्ता उखडला ;जवळबनकर संतप्त

### चंदनसावरगाव-जवळबन-सावळेश्वर मार्गाची दुरवस्था; कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील चंदनसावरगाव, जवळबन मार्गे सावळेश्वर कडे जाणाऱ्या डांबरी रस्त्याचे काम पूर्ण होऊन अवघे सहा महिने झाले नाहीत. अद्याप दमदार पाऊस ही झालेला नाही तरी रस्ता अनेक ठिकाणी उखडला आहे.

या रस्त्याच्या मागणी साठी तब्बल पंधरा वर्षे संघर्ष करावा लागला आहे.रस्त्यासाठी अनेक वेळा रास्तारोको आंदोलन उपोषण करण्यात आली होती. यानंतर तो रस्ता झाला आणि तो लगेच उखडून गेला.रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसून येत आहे.त्याबद्दल जवळबन येथील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.या रस्त्याचे काम करताना दर्जेदार साहित्याचा वापर करण्यात आला नसल्याने तसेच कामाच्या वेळी आवश्यक त्या गुणवत्तेची काळजी घेण्यात आलेली नाही. सहा महिन्यांतच रस्त्याची झालेली दुरवस्था पाहता संबंधित विभागाच्या देखरेखीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

रस्त्याची तातडीने पाहणी करून निकृष्ट कामाची चौकशी करावी,दोषी कंत्राट दारावर कायदेशीर कारवाई करावी आणि रस्त्याची दर्जेदार दुरुस्ती करावी,अशी मागणी जवळबन येथील ग्रामस्थांनी केली आहे.संबंधित विभागाने याकडे तातडीने लक्ष न दिल्यास आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे.दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे

कोणत्याही ठिकाणी थेट हाताने रस्ता उखडता येतो अशा पद्धतीचा निकृष्ट बोगस रस्ता करण्यात आला आहे.तात्काळ कारवाई न झाल्यास अभिषेक करपे,प्रथमेश करपे, गणेश करपे,आदित्य करपे,अमोल करपे, अमर घरत,विजय करपे,ओमकार करपे, सुमित करपे,अजित भाकरे यांनी तिव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# सांस्कृतिक कला विश्व समितीच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार संपन्न



केज/प्रतिनिधी

दि.२३ ऑगस्ट रोजी केज येथील शासकीय विश्रामगृह याठिकाणी सांस्कृतिक कला विश्व समितीच्या वतीने विविध क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त झालेल्या मान्यवरांचा तसेच बहुजन विकास सांस्कृतिक कला मंच च्या नवनिर्वाचित बीड जिल्हा उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर नागरगोजे तसेच बीड जिल्हा अध्यक्षापदी सुनिता नागरगोजे यांची अधिकृत रित्या नियुक्ती झाल्याबद्दल यावेळी सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा ही देण्यात आल्या तसेच या सत्कार सोहळ्या साठी बहुजन विकास सांस्कृतिक कला मंचा चे संस्थापक अध्यक्ष गायक संगीतकार दत्ता जी शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबासाहेब केदार सर हे होते. तसेच या कार्यक्रमा साठी विशेष उपस्थिती वन अधिकारी श्री. सय्यद साहेब यांची उपस्थित होते यावेळी २०२६ मध्ये ज्या मान्यवरांना पुरस्कार प्राप्त झाले अशा मान्यवरांचा यावेळी सन्मान सोहळा अगदी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यामध्ये केज तालुक्यातील तांबवा या ठिकाणचे जेष्ठ कलावंत शाहीर तुकाराम ठोंबरे यांना महाराष्ट्र शासनाचा लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्रदान करण्यात आला होता तसेच अड. अनिता मुंडे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राज्य स्तरीय सनक्रिस्टल गौरव पुरस्कार देण्यात आला तसेच अनिता कांबळे यांना नानासाहेब पाटील गौरव पुरस्कार शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा हा पुरस्कार देण्यात आला व गायन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य व उत्कृष्ट गायिका हा राष्ट्रीय कलारत्न पुरस्कार केज तालुक्यातील सुनिता बोधने यांना प्राप्त झाला अशा होतकरू मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या या कार्यक्रमासाठी सांस्कृतिक कला विश्व समितीचे सर्व पदाधिकारी तालुका अध्यक्ष अनिल वैरागे, उपाध्यक्ष मुनीर कुरेशी, उमाकांत बोधने,सुभाष ढाकणे,महिला तालुका अध्यक्ष सिंधू मुळेतसेच शहराध्यक्ष छबुताई अंधारे व विमल अंकुशे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य

डॉ.कविताताई गित्ते - कराड यांचा सत्कार संपन्न

केज/प्रतिनिधी

केज येथील सानेगुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य डॉ.सौ.कविता ताई गित्ते-कराड यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस आदित्य अशोकराव पाटील, बीड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रविण शेप,प्रताप मोरे, डॉ.दत्ता चाळक,मजहर शेख आदींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य, प्रयोगशिलता यामुळे राष्ट्रीय सन्मान प्राप्त झाला आहे.या सन्मानामुळे बीड जिल्ह्याची मान उंचावली आहे असे मत आदित्य पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ.सौ. कविताताई गित्ते - कराड यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.तसेच हा पुरस्कार ऊसतोड मजुरांच्या पाल्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेल्या योगदाना साठी मिळत असल्याने समाधान व्यक्त केले आहे.हा पुरस्कार राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मु यांच्या शुभहस्ते नवी दिल्ली येथे दि.५ सप्टेंबर २०२६ रोजी प्रदान करण्यात येणार आहे.

# राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे पुजारी रामकिसन महाराज हजारे यांचे निधन

## राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर झाले अंत्यसंस्कार



वडवणी प्रतिनिधी

भारत देशातील राजा हरिश्चंद्राचे एकमेव तीर्थक्षेत्र असलेले बीड जिल्ह्यातील राजा हरिश्चंद्र पिंपरी येथील राजा हरिश्चंद्र मंदिराचे पुजारी श्री ह भ प रामकिसन महाराज हजारे यांचे सोमवारी रात्री निधन झाले. मंगळवारी दुपारी त्यांच्यावर राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर अंत्यविधी करण्यात आला. यावेळी वारकरी सांप्रदायिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

रामकिसन महाराज हजारे हे मागील जवळपास ६० ते ६५ वर्षांपासून हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे पुजारी होते. विवाहित असले तरी त्यांना मूलबाळ नसल्यामुळे राजा हरिश्चंद्राच्या सेवेतच त्यांनी आपले आयुष्य खर्च केले. संत भगवान बाबा, संत भीमसेन बाबा यांचे पवित्र सानिध्य त्यांना लाभले होते. या दोन्ही संतांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे संगोपन केले. या ठिकाणी त्यांनी दरवर्षी होणाऱ्या महाशिवरात्र महोत्सवाचे वेळोवेळी सुंदर नियोजन केले. या भागातील प्रत्येक गावातील लहान लेकरांपासून ते वृद्धांपर्यंत ते परिचित होते आणि सर्वांसोबत त्यांचे अगदी जिव्हाळ्याचे संबंध होते. मुलबाळ नसल्यामुळे या भागातील सर्व लेकींना ते आपल्या मुलीसारखीच माया लावत होते. रामकिसन महाराजांची तब्येत चांगली होती. आळंदी येथे मागील काही दिवसांपासून ते गेले होते. त्या ठिकाणी त्यांची तब्येत अचानक ढासळली. त्यांना निमोनियाचा प्रादुर्भाव झाला. तीन दिवसांपूर्वी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र सोमवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची वार्ता समजल्यानंतर बीड जिल्ह्यातील वारकरी संप्रदायावर शोक पसरला आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दुपारी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर टाळ मृदंगाच्या गजरात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्यासह या भागातील सर्व सांप्रदायिक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## अंबाजोगाई येथील कर्तव्य मतीमंद मुलींचे निवासी विद्यालयात शालेय साहित्य व खाऊचे वाटप

अंबाजोगाई(प्रतिनिधी )

बाबासाहेब परांजपे प्रतिष्ठान संचलित कर्तव्य मतिमंद मुलींचे निवासी विद्यालय जिल्हा परिषद कॉलनी सदर बाजार, अंबाजोगाई येथे श्री गुरु रविदास बहुउद्देशीय मागासर्गीय सेवाभावी संस्था दिंद्रुड ता.माजलगाव जि.बीड या संस्थेकडुन मतीमंद मुलींना वह्या,

फ्रजिस्टर, पेन,बिस्कीट आदी शालेय साहित्याचे वाटप करुन मतीमंद मुलीच्या हाती तिरंगा देऊन स्वतंत्रता दिनाच्या निमित्ताने बाबासाहेब परांजपे प्रतिष्ठान संचलित कर्तव्य मतिमंद संस्थेला संत रविदास जी व संत कंक्कया महाराज यांची प्रतिमा भेट दिली.यावेळी संस्थापक अध्यक्ष श्री.भाऊसाहेब घोडके, सदस्य बिभीषन वाघमारे तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता चौधरी,विशेष शिक्षिका श्रीमती अनुजा नरारे,श्रीमती अर्चना ठोके,श्रीमती अमृता कदम,श्रीमती मीना लोमटे,श्री. दिलीप रानमारे सर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी मतीमंद मुलींच्या चेहऱ्यावर हसू फुलले होते. मुख्याध्यापीका अनिता चौधरी यांनी भाऊसाहेब घोडके यांच्या सह सर्वांचे आभार मानले आहेत.

# कार्यकारी अभियंता देवीदासराव चाटे यांच्या पत्नी कल्पना चाटे यांचे निधन

## केज परिसरात शोककळा ; आप्तेष्ट व परिचितां कडून भावपूर्ण श्रद्धांजली

केज/प्रतिनिधी

कार्यकारी अभियंता देवीदासराव चाटे यांच्या पत्नी कल्पना देवीदासराव चाटे यांचे सोमवार,दि.१७ऑगस्ट २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने चाटे कुटुंबीयांसह नातेवाईक,मित्रपरिवार व परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे.कल्पना चाटे या आपल्या प्रेमळ, मनमिळावू व आपुलकीच्या स्वभावा मुळे सर्व परिचितांमध्ये लोकप्रिय होत्या. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांनी एक जिव्हाळ्याची व्यक्ती गमावली असून त्यांच्या आप्तेष्टांनी दुःख व्यक्त केले आहे.

त्यांच्या पश्चात पती कार्यकारी अभियंता देवीदासराव चाटे, मुलगी उप विभागीय अधिकारी नम्रता चाटे, ड.अमिता चाटे, मुलगा ड.संकेत चाटे,सून जावाई व नातवंडे असा परिवार आहे.कल्पना चाटे या केज तालुका काँग्रेस कमिटीचे माजी तालुकाध्यक्ष बाळासाहेब ठोबरे यांच्या मोठ्या भगिनी होत.त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक,मित्र परिवार व परिचितांनी चाटे कुटुंबीयांचे सांत्वन करून दिवंगत कल्पना चाटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.त्यांच्या निधनाने सामाजिक व कौटुंबिक क्षेत्रात एक आपुलकीचे



व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

# बनसारोळा येथील आदर्श विद्यालयात विद्यार्थी संसदेची निवडणूक उत्साहात संपन्न

केज/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची मूल्ये रुजावीत,मतदानाचे महत्त्व समजावे आणि नेतृत्वगुण विकसित व्हावेत,या उद्देशाने आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,बनसारोळा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विद्यार्थी संसद निवडणूक दि.२५ ऑगस्ट २०२६ मंगळवार रोजी उत्साहात संपन्न झाली.

या निवडणुकीमध्ये विद्यार्थी संसद अध्यक्ष पदासाठी चि. गायकवाड आणि चि. अंकुशे हे दोन विद्यार्थी उमेदवार होते.तर विद्यार्थिनी प्रतिनिधी पदासाठी गौरी काकडे, ज्योती रोमन आणि कु. गळभिले




याविद्यार्थिनी निवडणूक रिंगणात होत्या.मतदान प्रक्रिया लोकशाही पद्धतीने पार पडली.बहुमताने चि.अंकुशे यांची विद्यार्थी संसद अध्यक्ष पदी,तर कु.गळभिले यांची विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली.सर्व विजयी उमेदवारांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.मतदानअधिकारी म्हणून कु.मुक्ता शिंदे आणि आरती गोरे यांनी जबाबदारी पार पाडली.त्यांना मुख्याध्यापक काकडे सर,सांस्कृतिक विभाग प्रमुख संतोष रोकडे सर आणि शिवाजी मांदळे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

निवडणूक प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी साळुंके सर,मुंडे सर, खाडे सर आणि पाखरे मॅडम यांचे सहकार्य लाभले.ही निवडणूक विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीची मूल्ये प्रत्यक्ष अनुभवण्याची आणि जबाबदार नेतृत्व शिकण्याची एक प्रेरणादायी संधी ठरली आहे.

# तरोडा (बु) येथील संत गाडगेबाबा चौक सुशोभीकरणाची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)-तरोडा (बु.) येथील श्री राष्ट्रसंत गाडगेबाबा चौक, कॅनॉल रोड, चेतन्यनगर परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र डेबोजी सेनेच्या वतीने महापौर कविताताई मुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



दि.२५ ऑगस्ट रोजी डेबोजी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापौर सौ.कविताताई मुळे यांच्या याबाबत निवेदन दिले. तरोडा (बु.) ग्रामपंचायत अस्तित्वात असतानापासून या चौकाला संत गाडगेबाबा यांचे नाव देण्यात आले असून, चौकात त्यांच्या नावाचा फलकही आहे. मात्र, अनेक वर्षांपासून चौकाच्या सुशोभीकरणाची मागणी करूनही अद्याप याबाबत ठोस कार्यवाही झालेली नाही, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या परिसरातील नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन चौकाचे सुशोभीकरण, आवश्यक विकासकामे तसेच संत गाडगेबाबांच्या कार्याला साजेसे सौंदर्यीकरण करण्यात यावे, अशी मागणी डेबोजी सेनेच्या वतीने करण्यात आली. यापूर्वीही महानगरपालिकेकडे अनेक वेळा निवेदने देण्यात आली असून, आता या मागणीची तातडीने दखल घेऊन कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

यावेळी नगरसेविका सुनीताताई जोधळे, डेबोजी सेनेचे अध्यक्ष हनुमंत दाताळकर, जिल्हाध्यक्ष प्रमोद भडारे, नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष मुंजाजी काकांडीकर, तुपा गावचे माजी सरपंच चांद पाशा, मार्तंड भंडारे, प्रल्हाद धर्मापुरीकर,संतोष तेलग, विठ्ठल भडारे, मारोती अस्कुलवार,विवेक चिंचडवाड,राहुल चिंचडवाड, दिगंबर कवठेकर, माणिक माचनवाड, गणेश शीलेवार, राजेश मांजरमकर, बालाजी कापसे, संभाजी तेलग, कैलास इबितदार, गोविंदराव कोळगावकर आदी कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




# भव्य भोंम प्रदोष कावड यात्रा उत्साहात संपन्न

## ‘हर हर महादेव’, ‘जय बमभोळे’च्या जयघोषाने तामसा दुमदुमले

तामसा (प्रतिनिधी) : भोंम प्रदोषनिमित्त तामसा येथे भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. बालाजी मंदिर व माऊली मंदिर येथून सुरू झालेली ही कावड यात्रा बारालिंग महादेव मंदिरापर्यंत सुमारे ३ किलोमीटर अंतर पार करत भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाली.‘हर हर महादेव’, ‘जय बमभोळे’च्या जयघोषात शेकडो महिला व पुरुष भाविकांनी कावड यात्रेत सहभाग घेतला. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत यात्रेची शोभा वाढवली. संपूर्ण मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.या कावड यात्रेला आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार कोहळीकर यांच्या हस्ते भाविकांना फळवाटप करण्यात आले.कावड यात्रेत महिला मोर्चा तालुका अध्यक्ष ममता जोशी, महिला शहर अध्यक्षा शिवसेना तन्वी मेहत्रे, अश्विनी धानोरकर, कांता डोरले, ज्योती डोणगावे, तारामती व्यवहारे, सुचिता संगणवार, अरुणा बँडेवार, रेश्मा लाभसेटवार, धनश्री बंडेवार, त्रिशा बंडेवार यांच्यासह शेकडो महिला व पुरुष भाविक उपस्थित होते.बारालिंग महादेव मंदिरात कावड यात्रेचा समारोप झाल्यानंतर भाविकांनी भगवान महादेवाचे दर्शन घेतले. यात्रेदरम्यान भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे तामसा शहरात धार्मिक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात एलपीजी सिलेंडर वितरण कालावधी २५ दिवस करा



नांदेड (प्रतिनिधी) जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये सध्या एलपीजी गॅस सिलेंडर वितरणात मोठी विसंगती दिसून येत असून, शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातही सिलेंडर मिळण्याचा कालावधी २५ दिवस करण्यात यावा, तसेच गॅस सिलेंडरचा होणारा काळाबाजार तात्काळ थांबवून सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्यात यावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने आज,२५ऑगस्ट २०२६ रोजी नांदेडचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सविस्तर मागण्यांचे निवेदन सादर केले.निवेदनात नमूद केल्यानुसार, शहरात दर २५दिवसांनी गॅस सिलेंडर दिला जातो. मात्र, ग्रामीण भागातील नागरिकांना तब्बल ४५ ते ५५ दिवसांनंतर सिलेंडर दिला जात आहे. ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबे ही मोठी व संयुक्त असल्याने एक गॅस सिलेंडर साधारणपणे ३० दिवसांच्या आत संपतो. त्यामुळे उर्वरित १५ ते २५ दिवसांसाठी ग्रामीण भागातील नागरिकांना गॅस मिळवण्यासाठी मोठी फरफट सहन करावी लागत आहे.या बिकट परिस्थितीचा गैरफायदा घेऊन काही गैरप्रवृत्तीचे लोक शहरातून २५ दिवसांच्या मुदतीचे सिलेंडर उचलतात आणि ग्रामीण भागात आणून ते चढ्या दराने, म्हणजेच अडीच ते तीन हजार रुपयांना विकत आहेत. यामुळे ग्रामीण भागातील गरीब जनतेची मोठी आर्थिक लूट होत असून गॅस सिलेंडरचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरू आहे.वंचित बहुजन आघाडीने निवेदनाद्वारे प्रामुख्याने खालील मागण्या केल्या आहेत.ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सुद्धा गॅस सिलेंडर वितरणाची मुदत ४५ ते ५५ दिवसांवरून कमी करून ती शहराप्रमाणे २५ ते ३० दिवस करण्यात यावी

शहरातून सिलेंडर आणून ग्रामीण भागात चढ्या दराने विकणाऱ्या टोळ्यांवर आणि काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी.या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव दिपक रुद्राजी मगर सह संघटक उत्तमराव वाढवे,जिल्हा उपाध्यक्ष के. एच. वने हतनीकर,पंढरीनाथ अहंकारे, धाराजी हिंगोली,सखाराम सीतळे, बंटी मोरे,सौरभ पावडे,विक्रम इंगोले यांच्यासह पक्षाच्या इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला या समस्येतून तातडीने बाहेर काढून योग्य तो तोडगा काढावा, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# दुर्गा फाऊंडेशन किनवट तर्फे विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप

किनवट प्रतिनिधी दि.२४ : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासोबतच गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दुर्गा फाऊंडेशन, किनवट यांच्या वतीने रामनगर येथील गुरुकुल आश्रम प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. दुर्गा फाऊंडेशनच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांसाठी सामाजिक उपक्रम राबविले जात असून, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री मिळावी आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थिनींना अभ्यासासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले असून, त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला यामुळे निश्चितच प्रोत्साहन मिळणार आहे. या कार्यक्रमाला नगरसेविका सौ. प्रिती धीरज नेम्मानिवार, दुर्गा फाऊंडेशन, किनवट चे अध्यक्ष अक्षय भोयर, समन्वयक दुर्गा भोयर यांची



प्रमुख उपस्थिती होती. तर यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मंगला सुकळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी सपना ताडपेलीवार, अनुजा तिरमनवार, अनिल राठोड, राजेश्वर पोचानीवार, कुमरे आणि दिलीप घोडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.

विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करताना त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, नियमित अभ्यासाची सवय लावणे आणि भविष्यात विविध क्षेत्रांत यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे, हा या उपक्रमामागील सामाजिक संदेश असल्याचे उपस्थितांनी सांगितले. दुर्गा फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे शाळा प्रशासन, शिक्षकवर्ग तसेच पालकांकडून कौतुक करण्यात आले. सामाजिक संस्थांनी शिक्षण क्षेत्रात पुढाकार घेऊन गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर सकारात्मक परिणाम होतो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. सामाजिक बांधिलकीतून शिक्षणाला बळ देण्याचा दुर्गा फाऊंडेशनचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला.